


# आत्मशक्ती नवरात्रौत्सव

निमित्त

## मनःपूर्वक शुभेच्छा !


आत्मचिंतनाद्वारे
विश्वशांतीचा संदेश देणारे मासिक


।।ॐ गुरुदेव।।

# आत्मा मालिक

ऑक्टोबर - २०२४

॥ सबका मालिक आत्मा ॥



# ॥ अमृतवाणी ॥

या जगात एकच सत्य आहे आणि ते म्हणजे आत्मा. जगातील सर्व वस्तू नष्ट होतील, सृष्टीत असंख्य घडामोडी होतील, पण आत्मा हा चिरकाल टिकेल. कारण त्याला आदिही नाही आणि अंतही नाही. अनादि कालापासून आत्मतत्त्व चालत आलेले आहे आणि अनंतकाळापर्यंत असेच चालत राहील. कारण तो अमर आहे. सर्व देवांच्या उत्पत्तीपूर्वी आत्मा अस्तित्वात होता म्हणून आपण आत्म्याची पूजा केली पाहिजे. आत्म्यावर प्रेम केले पाहिजे. तसेच क्षणभर केलेले आत्मचिंतन कितीतरी श्रेष्ठ आहे. आत्म्याची पुजा केल्यास ती सर्व देवांची पूजा होते.

ईश्वरप्राप्तीचा सर्वात साधा, सोपा आणि सहज मार्ग म्हणजे आत्मचिंतन. कारण ईश्वर आत्म्याच्या स्वरुपात प्रत्येकाच्या, हृदयात बसलेला आहे. नुसतं रुपाला न पाहता 'स्व-रुपाला' पहा आणि ईश्वर प्राप्ती करुन घ्या.

आत्मा हा निर्गुण आणि निराकार आहे. त्याला पाहण्यासाठी कोणत्यातरी सगुण साकार रुपाची आवश्यकता असते. म्हणून कोणत्याही आकारात निराकाराचे ध्यान करावे. सद्‌गुरुचे आत्मरुपात ध्यान करा. आत्म्याला जात, धर्म नसतो. हिंदू, मुस्लिम, शीख, पारसी सर्वांना आत्मचिंतनाने ईश्वरप्राप्ती होते. भगवान श्रीकृष्ण, येशुख्रिस्त, मोहंमद पैगंबर, गुरूनानक, भगवान महावीर, भगवान गौतम बुध्द या सगळ्यांनी आत्म्याची ओळख करुन घेऊन त्याचे चिंतन केले म्हणूनच ते ईश्वररुप झाले.

## ॥ आत्मा मालिक ॥

''आत्मचिंतनाद्वारे विश्वशांतीचा संदेश देणारे मासिक''

# मासिक ॐ गुरुदेव

वर्ष २३ वे अंक १० वा ऑक्टोबर २०२४
● RNI-MAHMAR/2001/4853

**संस्थापक संपादक**

हृदयनिवासी संत सच्चिदानंद महाराज
हृदयनिवासी संत देवानंद महाराज

**संपादक**

संत परमानंद महाराज
मो. ९५९५९७०२२०, ९९२२०७०२२०

**संपादकीय सल्लागार**

श्री. नंदकुमार सूर्यवंशी
श्री. भगवान दौंड
श्री. हनुमंत भोंगळे

**मार्गदर्शक**

संत निजानंद महाराज
संत विवेकानंद महाराज

**प्रसादालय विभाग (अखंड अन्नदान छत्र)**

श्री. प्रकाश भट, मो. ८६०५४६४५५५
श्री. बाळासाहेब गोर्डे, मो. ७५८८६९४०७४
श्री. प्रकाश गिरमे, मो. ९८५०३३८०५५

**धर्मशाळा (निवास व्यवस्था)**

कुमार पाटील, मो. ९९२२२२८६५५
विलास गायकवाड, मो. ९९२२१७४२११

**जनसंपर्क**

पराग धुमाळ (ध्यान योग मिशन कार्यालय)
मो. ७५८८६९४०८४, ८३८००३९३०५

संपादकीय - योग आणि परमात्माप्राप्ती - संत परमानंद महाराज ... ४
नैवेद्य हाचि देती। तेचि मुक्त होती।। -डॉ. विजय बाणकर ... ६
हरिपाठाच्या गाभाऱ्यात (भाग-६) - नामदेव सदावर्ते ... १०
काम क्रोध दैत्यावर कोरडा कडाडा वाजतो - डॉ. सुनील शिंदे ... १५
समाधान -बंडोपंत कुलकर्णी ... १७
आठवणीतील सत्संग यात्रा -बी. के. गायकवाड ... २३
सद्‌गुरू वंदना महोत्सव-२०२४ -बी. के. गायकवाड ... २६
शरीर की भक्ति क्यों? - नीता नरेश यादव ... २८

या अंकात प्रसिध्द झालेल्या लेखांतील मतांशी संपादक, प.पू. गुरुदेव माऊली, आश्रम संत, पदाधिकारी, मुद्रक आणि प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (वादप्रतिवाद कोपरगांव न्यायकक्षेत.)

ॐ गुरुदेव हे मासिक संपादक, मालक व प्रकाशक संत परमानंद महाराज, विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, मु.पो. कोकमठाण यांनी मुद्रक संतोष दत्तात्रय माळी, श्री ग्राफिक्स, गांधीनगर रोड, कोपरगांव, जि. अहमदनगर-४२३६०१ येथे मुद्रीत करुन विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, मु.पो.कोकमठाण, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर-४२३६०१ येथे प्रकाशित केले.

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



**संपादकीय**

## योग आणि परमात्माप्राप्ती

**योगात प्रगती केलेल्या योग्याच्या जीवनावर पूर्वकर्मांचा काही परिणाम होत नाही. आत्माच त्याला मार्गदर्शन करीत असतो. सामान्य जीवाला मंदगतीच्या उत्क्रांती अवस्थांतून टप्प्याटप्प्याने जावे लागते. या सर्व टप्प्यांवर त्याच्या चांगल्या किंवा वाईट अहंकारयुक्त कर्मांचे परिणाम जणू एखाद्या परीक्षकाप्रमाणे त्यास अधिकाधिक उन्नत करीत असतात. पण योगाभ्यासूला हा कमीगतीचा आणि टप्प्याटप्प्याने प्रवास करणारा मार्ग टाळता येतो.**

**-संत परमानंद महाराज**

**म**नुष्य हा मायेच्या किंवा निसर्गनियमांच्या अधीन असतो. त्याच्या शरीरात वाहणारा प्रवाह हा बहिर्मुख असतो. या प्रवाहाचा इंद्रियांकडून दुरुपयोग होतो व नाश होतो. योगाच्या अभ्यासाने या प्रवाहाची दिशा बदलली जाते. प्राणशक्तीचा विनियोग अंतर्विश्व जागृत करण्यात होतो. प्राणशक्तीचे मेरुदंडात संचारणाऱ्या कुंडलिनीशक्तीशी मीलन घडवून आणले जाते. कुंडलीनी शक्ती जागृत झाल्याने योग्याचे शरीर व त्याच्या मेंदूच्या पेशी जणू अमृतप्रवाहाने पुनर्जीवित होतात. जीवाला जडदेहाशी संलग्न करून टाकणाऱ्या श्वास-उच्छवासरुपी रज्जूस तोडून योगक्रिया आयुष्य वाढवते आणि साधकाची जाणीव परमात्मस्वरुप समजण्यासाठी व्यापक होते. मन व जडदेहात जखडलेली इंद्रिये यांच्यात चालत असलेला हा विग्रह योगतंत्र थांबवते आणि साधकास शाश्वत सुखाचा लाभ मिळवून देते. यानंतर त्याला ज्ञान होते की, त्याचे खरे अस्तित्व हे देहाच्या पिंजऱ्यात किंवा श्वासोच्छवासात नाही.

मन आणि इंद्रिये प्राणशक्तीने एकत्र बांधून टाकलेली आहेत. अंतर्निरीक्षण व मौन यांच्याद्वारे त्यांना जबरदस्तीने वेगळे करणे हे अशास्त्रीय आहे. मन जेव्हा चिंतन करीत असते, तेव्हा ते परमात्मस्वरुपात परत जाण्याचा प्रयत्न करीत असते. त्या मनाला इंद्रिये आपल्या प्रभावाने शरीराकडे खेचत असतात. साधना, ज्यामध्ये जीवनशक्तीमार्फत मनाला प्रत्यक्ष रीतीने काबूत आणले जाते, ती परमतत्वाकडे पोहचण्याचा सोपा, सर्वात परिणामकारक व शास्त्रशुद्ध मार्ग आहे. परमतत्वाकडे पोहचण्यासाठी इतरही मार्ग आहेत. मात्र, योगाद्वारे हा प्रवास अधिक वेगाने होतो.

योगशास्त्राची निर्मिती धारणा व ध्यान यांच्या अभ्यासाच्या सर्व पद्धतींचा अनुभव घेऊन केलेली आहे. योगाभ्यासामुळे दृष्टी, श्रवण, वास, चव आणि स्पर्श यांच्या इंद्रियांपासून प्राणशक्तीला आपल्या इच्छेनुसार वाटेल तेव्हा साधक बाहेर खेचू शकतो. अशा तऱ्हेने ज्ञानेंद्रियांपासून आपली जाणीव अलग केल्यावर तो आपले चित्त पारलौकिक किंवा ऐहिक विषयांकडे वळवू शकतो. त्यास मनोविकार व अस्वस्थ विचार यांनी भरलेल्या ऐहिक क्षेत्राकडे प्राणशक्ती त्याच्या मनाविरूद्ध परत आणू शकत नाही. योगात प्रगती केलेल्या योग्याच्या जीवनावर पूर्वकर्मांचा काही परिणाम होत नाही. आत्माच त्याला मार्गदर्शन करीत असतो. सामान्य जीवाला मंदगतीच्या उत्क्रांती अवस्थांतून टप्प्याटप्प्याने जावे

लागते. या सर्व टप्प्यांवर त्याच्या चांगल्या किंवा वाईट अहंकारयुक्त कर्मांचे परिणाम जणू एखाद्या परीक्षकाप्रमाणे त्यास अधिकाधिक उन्नत करीत असतात. पण योगाभ्यासूला हा कमीगतीचा आणि टप्प्याटप्प्याने प्रवास करणारा मार्ग टाळता येतो.

आत्मोन्नतीच्या या उच्च प्रतीच्या साधनेने योगी अहंकाराच्या बेडीतून मुक्त होतो आणि तो सर्वव्यापक होतो. याउलट सामान्य माणसाला गुलामगिरीचाच अनुभव घ्यावा लागतो. त्याला उत्क्रांतीच्या नैसर्गिक टप्प्यांटप्प्यांतून जावेच लागते. त्याला अनेक जन्म घ्यावेच लागतात. मनुष्याच्या शरीरात किंवा मनात या आत्म्याची थोडी जरी अवज्ञा झाली तरी त्याचे पर्यवसान शरीरात रोग किंवा मनामध्ये विकृती होण्यात होते. मनुष्य आपल्या निरर्थक अहंकारामध्ये फार समरस होतो. त्यामुळेच तो मी विचार करतो, मी कार्य करतो, मला वाटते, मी अन्नाचे पचन करतो, मी स्वतःला जीवंत ठेवतो अशा प्रकारची अहंभावना सतत बाळगत असतो. त्याने बारीक विचार केला तर त्याला समजेल की तो इतरांपेक्षा स्वतंत्र असे काहीच करीत नाही. तो हे सर्व एखाद्या सांगकाम्याप्रमाणे म्हणजे आजूबाजूची परिस्थिती, पूर्वकर्म व निसर्ग यांच्यानुसारच करीत असतो. प्रत्येक मनुष्याच्या बौद्धिक प्रतिक्रिया, भावना, मनःस्थिती आणि सवयी या त्याच्या पूर्वजन्मीच्या किंवा चालू जन्मातील कार्यकरणसंबंधामुळे निश्चित केल्या जातात. या सर्वांच्या वरती आत्मा राज्य करीत असतो. तत्कालीन खऱ्या वाटणाऱ्या गोष्टींकडे दुर्लक्ष करून बेलगाम विचारांना दूर ठेवत योगी या सर्व मायाजालातून बाहेर पडतो व अनिर्बंध अशा परमतत्त्वाप्रत जातो. अशा प्रकारे योगाच्या माध्यमातून मनुष्यास अध्यात्मिक सत्याची, आत्मतत्वाची प्रचीती करून घेता येते.

सच्चा योगी हा शारीरिक वासनांशी मिथ्यारुपाने निगडित होणारे आपले विचार, इच्छा, भावना मागे खेचून घेतो व मन, चित्त, मेरुदंडातील चक्रामध्ये वास करीत असलेल्या अतिंद्रिय शक्तीशी युक्त होऊन परमेश्वराने ज्या स्वरुपात हे जग निर्माण केले, त्या स्वरुपाच्या जगात राहतो. आपली परमोच्च आकांक्षा सफल झाल्यावर तो अक्षय परमानंदमय तत्त्वाच्या अंतिम लोकामध्ये सुरक्षित राहतो. म्हणून भगवान श्रीकृष्ण गीतेत म्हणतात, तप करणाऱ्या तपस्व्याहून योगी अधिक उच्च आहे. तो ज्ञानी जनांहूनही अधिक श्रेष्ठ मानलेला आहे. योगी हा कर्मकांड करणाऱ्यांहूनही श्रेष्ठ आहे. म्हणून, हे अर्जुना, तू योगी हो.

|| आत्मा मालिक ||

**-संत परमानंद महाराज,**
संपादक

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



## नैवेद्य हाचि देती। तेचि मुक्त होती।।

माणसाला ज्याप्रमाणे गवत, कडबा व भुसा हे पशुंचे खाद्य देऊन चालत नाही त्याप्रमाणेच नरतनुचे म्हणजे माणसाच्या शरीराला पोषक असणारे अन्नपाणीही देवाला देऊन चालत नाही. अर्थात, अगोदर म्हटल्याप्रमाणे, ते देऊन त्यांचा जसा देवाला काही उपयोग नसतो तसाच ते देणाऱ्या लोकांनाही त्यांचा काही उपयोग होत नसतो (म्हणजे पुढे स्पष्ट म्हटले आहे त्याप्रमाणे ते देणाऱ्याला देवाधिदेव भेटत नसतो व परिणामी मुक्तीही मिळत नसते). तरीदेखील लोक तेच अन्नपदार्थ नैवेद्य म्हणून देवाच्या मूर्तिंपुढे ठेवीत असतात. (त्यामुळे) कित्येक दिवसांपासून देव उपाशी पडला (राहिला) आहे.

**-डॉ. विजय बाणकर**

'तन मन दिले तों काय, निजमन दिले न जाय।
निजमन न दिले तयाला, मन हे मानीत नाय।।'
(संत श्रीकबीर)

जो नैवेद्य दिल्यावर देव प्रसन्न होतो, व्यक्ती आत्मरूप देवच होऊन जाते व मुक्त होते आणि अगदी क्वचितच कुणी एखादा भक्त जो नैवेद्य देवाला देऊन कृतार्थ होत असतो, त्या देवाला प्रिय असणाऱ्या नैवेद्याचे स्वरूप श्रीहंसराजस्वामी यांनी आपल्या 'वेदान्त काव्यलहरी'मध्ये स्पष्ट करून ठेवले आहे. त्या काव्यपंक्ती अशा आहेत -

'नैवेद्य श्रीहरीसी, दूध फळें अन्न भक्त देतात।।
परि हें परमात्म्याचें खाद्य नव्हे; नेणती कसें भक्त।।१।।
फळ दूध अन्न आहे शरिराचें भक्ष्य; जीव पुष्ट बने।।
परमात्मा जीव नव्हे, शरिर नव्हे, व्यर्थ खाद्य हें देणें।।२।।
तृण कडबा भूस, पशूखाद्य जरी घातलें मनुष्यास।।
चालेल काय? तैसें नरतनुचें खाद्य तोय देवास।।३।।
यास्तव देव उपाशी, किती दिवसापासुनी असा पडला।।
विरळा भक्त दयाळू, केव्हां परि त्यास देइ खायाला।।४।।
कंठीं प्राण धरोनी जगला, तितुक्यावरीच तो देव।।
दुष्काळ त्यांस मोठा अन्नाचा, अन्न त्यांस जिवभाव।।५।।
जीवचि खाउनि जगतो देव, तया जीव देत ना कोणी।।
जें देव खाइना तें, जन देती व्यर्थ दूध, दहि, लोणी।।६।।
भक्त खरा जो देई, देवासी जीव आपुला खाया।।
जीव बने मग देवचि, नातरि हा जीव खाइ यम वाया।।७।।
यम जीव जरी घेई, पुनर जनन मरण ठेविलेंच असे।।
देवांस जीव देतां, जन्ममरण कोठुनी तया लाहे।।८।।
देवास जीव देणें म्हणजे, मी देह प्राण मन बुद्धि।।
नोहे, निश्चित जाणुनि करणें अभिमान त्याग जिवबुद्धी।।९।।'

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

या काव्यपंक्तींचा भावार्थ समजून घेताना, देवाला द्यावयाच्या त्या नैवेद्याचे स्वरूप लोकांना कळावे आणि ज्यांना फक्त देवाधिदेवच हवा असतो त्या सात्त्विक भाविकांनी पूर्णतः निष्काम भावनेने तोच नैवेद्य देवाला द्यावा म्हणून उदाहरणार्थ संत श्रीतुकाराम महाराज यांनी आपल्या पन्नासहून अधिक अभंगांमधून त्याचे सूचक वा स्पष्ट उल्लेख करून ठेवले आहेत,१ असे आपल्या लक्षात येते आणि परिणामी आपल्या अगदी साध्या सोप्या भाषेत सहजपणे बोलून वा लिहून ठेवलेल्या अभंगांमध्ये वेदान्त म्हणजे चारी वेदांना अभिप्रेत असलेले सर्व कल्याणकारी सिद्धान्त व्यक्त होऊन गेले आहेत या अर्थाची **'तुका तरी सहज बोले वाणी। वेदान्त त्याच्या घरीं वाहे पाणी।।'**, ही त्यांची अ-भंग सत्ययुक्त वाणी आपल्याला स्मरत राहते.

श्रीहरीपुढे म्हणजे वास्तविक पाहता राम, कृष्ण, विठ्ठल वगैरे देवांच्या पाषाण, माती वा विशिष्ट धातूंपासून कलाकार मानवांनी घडविलेल्या मूर्तिंपुढे भाविक लोक दूध, फळे वगैरे पदार्थ देवाने खावेत म्हणून ठेवीत असतात. परंतु हे अन्नपदार्थ तो परमात्मा कधीही खात नसतो; खरे तर, (नंतर) ते माणसेच खात असतात, ते अन्नपदार्थ माणसांचे भक्ष्य आहे; ते परमात्म्याचे खाद्य नव्हे, हे लोक जाणीत नाहीत.

देवाला जे अन्न हवे असते ते लोक कां बरे जाणून घेत नाहीत, ते मात्र कळत नाही, असे म्हटल्यानंतर, फळे, दूध वगैरे अन्नपदार्थ हे माणसाच्या शरिराला पोषक असतात, ते खाल्ल्यामुळे देह व 'मी देह' हा भाव जीवाच्या ठिकाणी पुष्ट होत असतो, परमात्मा म्हणजे देव हा काही जीव वा शरीर नाही, तो या दोन्हींहून निराळा आहे म्हणजे देवाचे स्वरूप जीवाहून व शरीराहून वेगळे आहे, म्हणून त्याला फळे, दूध वगैरे खाद्यपदार्थ देणे हे व्यर्थ होय, असा आपला सुस्पष्ट अभिप्रायही श्रीहंसराजस्वामींनी व्यक्त करून ठेवला आहे.

देवाला ते पदार्थ देऊन जीवाला आपल्या मूळ आत्मस्वरूपाचे ज्ञान होत नसते व परिणामी मुक्तीरूपी सर्वोत्तम शुभलाभही त्याला कधी होत नसतो. ज्याप्रमाणे गवत, कडबा व भुसा हे पशुंचे खाद्य माणसाला देऊन चालत नाही त्याप्रमाणेच नरतनुचे म्हणजे माणसाच्या शरीराला पोषक असणारे अन्नपाणीही देवाला देऊन चालत नाही. अर्थात, अगोदर म्हटल्याप्रमाणे, ते देऊन त्यांचा जसा देवाला काही उपयोग नसतो तसाच ते देणाऱ्या लोकांनाही त्यांचा काही उपयोग होत नसतो (म्हणजे पुढे स्पष्ट म्हटले आहे त्याप्रमाणे ते देणाऱ्याला देवाधिदेव भेटत नसतो व परिणामी मुक्तीही मिळत नसते). तरीदेखील लोक तेच अन्नपदार्थ नैवेद्य म्हणून देवाच्या मूर्तिंपुढे ठेवीत असतात. (त्यामुळे) कित्येक दिवसांपासून देव उपाशी पडला (राहिला) आहे.

क्वचित कुणी एखादा दयाळू सद्भक्त मात्र देवाला हवे ते खावयास देत असतो. (जणू अशा 'खऱ्या' भक्तांकडून आपणास हवे असलेले अन्न खावयास मिळेल) या आशेवरच तो आपले प्राण कंठीं धरून जगला (जगत) आहे.२ भक्ताने आपला जीवभावच देवास द्यावयाचा असतो. भक्ताचा जीवभाव हेच देवाचे खरे अन्न होय. देवाधिदेवाला हवे असलेल्या या जीवभावरूपी अन्नाचा मोठा दुष्काळ असतो. जीवच खाऊन देव जगत असतो. पण त्याला कुणीही आपला जीव देत नाही. आणि, देव जे खातच नसतो ते दूध, दही लोणी वगैरे अन्नपदार्थ मात्र लोक त्याला देत राहतात. त्यांचे ते देणे अर्थातच व्यर्थ होय.

जो खरा भक्त असतो तो मात्र देवाला आपला जीवच खावयास देत असतो. भक्ताने आपला जीव देवास दिला की तो जीवच देव बनतो.३ नाही तर, तो जीव यमाकडून व्यर्थच खाल्ला जात असतो. त्या जीवास यम खाऊन टाकतो म्हणजे त्यास तो घेऊन जातो व त्याच्या कर्मांचा परिपाक म्हणून जन्ममरणाच्या फेऱ्यात तो अगतिकपणे अडकून पडतो. याउलट, देवाला आपला जीव अर्पण करतो तो मुक्त होतो म्हणजे त्या भक्ताचा जन्ममरणाचा फेरा टळतो.

देवाला जीव देणे म्हणजे देह, प्राण, मन, बुद्धी हे मी वा माझे मूळस्वरूप नाही, हे अंतिम सत्य निश्चितपणे जाणून घेणे आणि त्यांबाबतचा अभिमान बाळगून असणे ही जी जीवाच्या ठिकाणी बुद्धी असते तिचा निःशेषपणे त्याग करणे होय, असे श्रीहंसराजस्वामी यांनी शेवटी सुस्पष्ट करून ठेवले आहे. आणि, हाच विचार म्हणजे

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

'देवाला जीवच हवा असतो किंवा द्यावयाचा असतो' म्हणजे नेमके काय करावयाचे असते ते संत श्रीतुकाराममहाराज यांनीही (यानंतर टीप क्र.१ मध्ये दिलेल्या अनेक अभंगांमधून लोकांना) समजावून सांगितले आहे.

* * * * *

**टिपा :**

* श्रीकबीरकृत मूळ दोहा :

तन मन दिया तो क्या हुआ, निज मन दिया न जाय। कहे कबीर ता दास सों, कैसे मन पतियाय।।

१. अ) देवाला जीव दिला, देह समर्पित केला तरच देव भेटतो, जीव व शिव एकरूप होतात, जीव देवच होतो, या श्रीहंसराजस्वामींच्या म्हणण्याला संत श्रीतुकाराम यांच्या पन्नासहून अधिक अभंगांमध्ये दुजोरा मिळतो. त्यांतील काही अभंगांची चरणे अशी आहेत :

(१) नारायण जोडे एकविध भावें। तुका म्हणे जीवें जाणे लागे।। (अभंग : द्वेषाचिया ध्यानें);

(२) देउनिया जीव। बळी साधिला हा ठाव।। (अभंग : हे माझी मिराशी);

(३) लाभ नाहीं फुकासाठीं। केल्यावीण जीवासाटीं।।२।। तुका म्हणे रणीं। जीव देतां लाभ दुणी।।३।। (अभंग : एका बीजा केला);

(४) वेचावें ते जीवें। पूजा घडे ऐशा नावें।।१।।;

(५) शक्ती द्याव्या देवा । नाही पदार्थी सेवा।। मुख्य आहे ऐसा धर्म। जाणते हो जाणा वर्म।। (अभंग : उभा ऐल थडी);

(६) तुका म्हणे आम्ही बळी। जीव दिधला पायांतळी।। (अभंग : आता जावे पंढरीसी);

(७) तुका म्हणे बळी। जीव दिला पायांतळीं।। (अभंग : तुज पाहाता समोरी);

(८) तुका म्हणे मिळे जिवाचिये साटीं। नाहीं तरी गोष्टी बोलों नये।। (अभंग : नाहीं संतपण);

(९) बोळवुनी देह सांडियेली शुद्ध। सारियेला भेद जीव शिव।। (अभंग : आता हे शेवटीं);

(१०) भक्तीची ते जाती ऐसी। सर्वस्वासी मुकावें।। (अभंग : संसाराचा माथां);

(११) देह नव्हे मी हें सरे। उरला उरे विठ्ठल।।१।। तुका म्हणे जीवासाटीं। देव पोटीं पडेल।।३।।;

(१२) बळी दिला जीवभाव। नेणे आणिकांचे नांव। धरिला एक भाव। तो विश्वास फळला।। (अभंग : आम्ही आइते जेवणार);

(१३) ..जेणें तू जोडसी नारायण। नासे जीवपण भवरोग।। (अभंग : बरवे झाले);

(१४) जीवभाव तुझ्या ठेवियेला पायीं। तूं चि सर्वा ठायीं एक आम्हां।।२।। (अभंग : (अभंग :पढियंतें आम्ही);

(१५) देहभाव तुझ्या ठेवियेला पायीं। आणि मी काही नेणे दुजे।।अवघा निरोपिला तुज देहभाव। आता मज पाव पांडुरंगा।। (अभंग : अभयदान मज);

(१६) हित सांगे तेणें दिले जीवदान।..।।१।।;

(१७) मनेंसहित वाचा काया। अवघें दिलें पंढरीराया।। (अभंग : प्रेमसूत्र दोरी);

(१८) जनावेगळे हे असे अभिन्नव। बळी दिला जीव म्हणऊनि।। (अभंग : तरी हांव केली);

(१९) देहभाव आम्ही राहिलों ठेवूनि । निवांत चरणीं विठोबाच्या ।।१।।;

(२०) माझिये मनींचा जाणा हा निर्धार। जिवासि उदार जालों आतां।।१।। जीवभाव तुझ्या ठेवियेला पायीं।;

(२१) जोडिलें तें आता न सरे सारितां। जीव बळी देतां हातां आले।।१।।;

(२२) भावनेच्या मुळें देव अंतरला। शिरला संदेह भयें पोटीं।।१।। पोटीं होते मागे द्यावा जीव ऐसे। बोलिल्या सरिसे न करवे।।२।। न करवे त्याग जीवाचा या नास। नारायण त्यास अंतरला।।;

(२३) तुका म्हणे तरी सापडे निधान। द्यावा ओवाळून जीवबळी।। (अभंग : ऐसा कोणी नाही);
(२४) साधावा तो देव सर्वस्वाचे साटीं। ..।।१।।;
(२५) तुका म्हणे नेम प्राणासंवसाटीं। तरीच या गोष्टी विठोबाची।। (अभंग : धीर तो कारण);
(२६) नाही जों वेंचलो जिवाचिया त्यागें । तोंवरी वाउगे काय बोलो।।१।।;
(२७) समर्पिला जीवभाव। धरिला भाव अखंड।। (अभंग : जरि हे आड);
(२८) शूर तरी सत्यचि व्हावे। साटीं जीवें करूनि।। (अभंग : पात्र शुद्ध);
(२९) मिठी घालीन या जीवाचिया त्यागें । (अभंग : भरिला उलंडूनि);
(३०) तुका म्हणे जीवें भावें । सत्या मानविजे देवें।।३।। (अभंग : पाववावें ठाया); (३१) आधीं आपणयां नासी । तरि उतरे ये कसीं ।। (अभंग : जग अवघें देव);
(३२) वास वासनेसी नाहीं। मन पांगुळलें पायीं।। शेष उरला तुका। जीवा जीवीं जाला चुका।। (अभंग : तान्हे तान्ह प्याली);
(३३) जीवशिवा होतां चुका । तेथें तुका विनटला।। (अभंग : एक वेळ);
(३४) तुका देखे जीवीं शिव। हा तेथींचा अनुभव।। (अभंग : पंडित म्हणतां);
(३५) चिंता मोह आशा ठेवुनि निराळी। देईन हा बळी जीव पायीं।। (अभंग : राम कृष्ण ऐसी);
(३६) तुका म्हणे व्हावे देहासी उदार। रकुमादेवीवर जोडावया।। (अभंग : जुंझायाच्या गोष्टी);
(३७) प्राण समर्पिला आम्ही। आतां उशीर कां स्वामी।।१।।;
(३८) जेणें हा जीव दिला दान । तयाचें करीन चिंतन । जगजीवन नारायण । गाईन गुण तयाचे ।।१।।;
(३९) देह समर्पिजे देवा। भार कांहीं च न घ्यावा। होईल आघवा। तुका म्हणे आनंद।। (अभंग : काळ सारावा);
(४०) तुका म्हणे जीवें। आधी मरोनि राहावे।। (अभंग : हालवूनि खुंट);
(४१) तुका म्हणे जीव। समर्पून भाकी कींव।। (अभंग : सर्व भाग्यहीन);
(४२) देह तुझ्या पायीं। ठेवुनि झालो उतराई।। (अभंग : होऊनि कृपाळ);
(४३) तुका म्हणे काया करीन कुरवंडी। ओवाळूनि सांडी मस्तक हे।। (अभंग : एकवेळ करी);
(४४) तुका म्हणे मी सगळाच विरालो। विठ्ठलचि जालो दर्शनानें।। (अभंग : डोळियांचे दैव).

ब) संत श्रीनामदेव यांनीदेखील देवाने नैवेद्य स्वीकारावा म्हणून गळफास घेऊन जीव द्यायला सुरुवात केली म्हणजे ते आपला जीवभाव अर्पण करावयास लागले तेव्हाच मूर्तितला देव प्रसन्न झाला, हे पूर्वीच्या एका लेखातूनही सूचित केले गेले आहे.

२. 'देव भावाचा भुकेला' आहे तसेच 'भाव तोचि देव', असे जे संत व सर्व लोक म्हणत असतात त्या म्हणण्याचा परम म्हणजे खरा अर्थ श्रीहंसराजस्वामी यांनी स्पष्ट केला आहे. 'कुठे शोधिशी रामेश्वर अन् कुठे शोधिशी काशी? हृदयातील भगंवत राहिला हृदयातून उपाशी', असे सुधीर फडके यांनी गायलेल्या सुपरिचित भक्तिभावगीतातही देव कधी व का उपाशी राहतो, ते सूचित केले गेले आहे.

३. 'देव पाहावयासी गेलो । तेथे देवचि होऊनी ठेलो ।।' - संत श्रीतुकाराम अभंग ( देव माझा मी देवाचा..)

**- डॉ. विजय बाणकर,**

मु. कोल्हेवाडी, पो. खडकवासला (आर. एस.)

सिंहगड रोड, पुणे - ४११०२४

(९३२५५८८०९५)

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

## हरिपाठाच्या गाभाऱ्यात (भाग-६)

### सद्गुरु निवृत्तीनाथ हरिपाठ



या जगात सर्व प्राणीमात्राच्या ठायी दया आणि शांती ठेवणारा निश्चित योगी समजावा. असा सर्वत्र ईश्वर पाहणारा योगी होण्यासाठी मुंडण अथवा देहदंड करावा लागत नाही. केवळ अखंड हरिनाम कीर्तन करावे, सर्व जीवांत शिवात्मा वास करीत आहे. जीवमात्रांच्या ठायी दया, क्षमा, शांती, करुणामय वृत्ती ठेवावी. ज्याप्रमाणे सूर्य आकाशात प्रकाशतो आणि असंख्य नक्षत्रे लोप पावतात व तो एकटा सूर्य प्रकाशत राहतो. त्याप्रमाणे सर्व स्वरुपात आत्मा एकच आहे. चंद्र आकाशात येताच ज्याप्रमाणे पृथ्वीवरील कमळ उमलते. दोघांत एकच चैतन्य खेळत असल्यामुळे आनंद प्रकट होतो.

**-नामदेव सदावर्ते**

**सं**त पंचरत्नातील सद्गुरु निवृत्तीनाथ यांचा हरिपाठही अत्यंत उच्च प्रतीचा असून गूढ आत्मज्ञान प्रकट करणारा आहे. नवनाथांतील श्रेष्ठ सद्गुरु श्री गहिनीनाथ यांचा अनुग्रह लाभलेल्या संत निवृत्तीनाथांनी सर्वांना ईश्वर नामस्मरणाविषयी आपले मनोगत हरिपाठातून प्रकट केलेले आहे. जनसामान्य भाविकांना सोपी उपासना, मार्गदर्शन व उपदेश करीत आहेत. संत निवृत्तीनाथांचा हरिपाठ पंचवीस अभंगांचा आहे. ते म्हणतात-

**नामाचेनि स्मरणें नित्य पै सुरवात।**
**दुजियांची मात नेणो आम्ही।।**

माझ्या हृदयात श्रीहरीवाचून दुसरे दैवत नाही. वाणीने मी श्रीपतीचे नाम अखंडपणे घेत असतो. रामकृष्ण मूर्तीचे नाम मी सतत घेतो. त्यामुळे आम्ही तृप्त आहोत. नामस्मरणानेच आम्हाला नित्य मंगलस्नान घडते. नामस्मरणाशिवाय दुसरे काही आम्ही जाणत नाही. हृदयकमलात केशीराजाचे स्मरण करून आम्ही श्रीहरीच्या नामाचा अखंड जप करतो.

**हरिवीण चित्ती न धरी विपरीत।**
**तरताती पतित रामनामे।।**
**विचारूनि पहा ग्रंथ हे अवघे।**
**जेथे तेथे सांगे रामनाम।।**

वेदशास्त्र-पुराणे ह्या ग्रंथांचे शोध घेऊन पाहा, जेथे तेथे रामनामच तारक आहे असे सांगितलेले आहे. म्हणून हरिनामाशिवाय, श्रीहरिशिवाय ध्यानात, मनात दूसरे काहीच आणू नको. रामनामस्मरणाने पतितांचा उद्धार होतो. व्यासादिक मुनींनी नित्य रामनाम घेतल्यानेच त्यांना वैकुंठनिवास प्राप्त झाले. शुकादिक मुनींनी संसारात विरक्त राहून निर्धाराने हरीनामोच्चार केला. पूर्वायुष्यात चोऱ्या, वाटमाऱ्या करणाऱ्या वाल्मीकी रामनामात रममाण झाल्यामुळेच तरून गेले. मी रामनामी मन दृढ केल्यामुळेच सर्व गूढांची मला उकल झाली.

**काय हे ओखद रामनामामृत।**
**हरिनामे तृप्त करी रया।।**

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

हरिच्या नामाचे स्मरण करणे हेच संसारातील सार आहे आणि त्यायोगेच जीवाचा तरणोपाय होईल. त्याशिवाय जीवाची संसारदशा सुटणार नाही. श्रीहरी नामजपाने जीवाला मोक्ष मिळेल. रामनाम हेच दिव्य अमृतासम औषध आहे. ते जड देहाचीही तृप्ती करणारे आहे.

**एकाविण दुजे नाही पै ये सृष्टी।**
**हे ध्यान किरिटी दिधले हरि।।**

एका श्रीहरीवाचून या सृष्टीत दुसरे काहीही नाही, असे अर्जुनास श्रीहरीने ज्ञान-ध्यान दिले. विश्वरूपदर्शनाद्वारे हेच गुह्य ज्ञान श्रीहरीने अर्जुनास दिले. अर्जुनास दिव्यदृष्टी दिल्यानंतर देवाने जे विश्वरूप दाखविले, ते पाहून अर्जुन आश्चर्यचकित झाला. त्यास अध्यात्मिक विराट स्वरुपाचे दर्शन घडल्यावर श्रीहरी ह्या सर्व जीवमात्रांत निरंतर भरलेला आहे, हे गुह्यज्ञान घडले. सर्वत्र अद्वैताचे दर्शन झाल्यावर सृष्टीत श्रीहरीवाचून दुसरे दैवतच नाही, हे आत्मज्ञान अर्जुनास प्राप्त झाले. हरिनामजपाने आनंदाची अखंड पर्वणी साधते. संत निवृत्तीनाथ म्हणतात-

**निवृत्ती म्हणे हरिनामपाठ जपा।**
**जन्मांतर खेपा अंतरती।।**

श्रीहरीनाम जीवाचा उद्धार करणारे आहे. याशिवाय दुसऱ्या तत्वाची थोरवी आम्ही जाणत नाही. नारायण नामजपाने अनेक पतीत उद्धरून गेले. हरी हे एकच तत्व सर्वत्र भरलेले आहे. असे सर्व शास्त्रे व पुराणे सांगतात. हरिनामस्मरण केले असता यम-काळही थरथर कापतो. नामजपाने जन्ममरणाच्या खेपा चुकतात.

**गगनींचा घन जातू पै वारेन।**
**अवचिता पतन अधःपये।।**
**अध उर्ध्व हरि भाविला कुसरी।**
**प्रपंच बोहरी आपोआप।।**

वायू आकाशातील मेघांना एकीकडून दुसरीकडे नेत असताना वितळून वरून अकस्मात पाणीरूपाने मेघ खाली पडतो. खाली आणि सर्वत्र हरिच भरला आहे, असे जो मानतो त्याची या संसारातून मुक्तता होते. सर्वत्र हरिमय सृष्टी पाहणाऱ्याला प्रपंचाचा मोह उरत नाही. हरिस्मरणाने काळालाही मर्यादा पडते. देवतरूंमध्ये श्रेष्ठ अशा अश्वत्थ वृक्षाच्या प्रचंड पसाऱ्याप्रमाणे या सृष्टीचा विस्तार आहे, असे शास्त्रात सांगितले आहे. पण आम्हाला हा विस्तार नको. प्रपंचाचा विस्तार वाढविणाऱ्या वृक्षापेक्षा आम्हाला ईश्वर हवा. श्रीहरी या अक्षराचे वळण इंद्रियांना लागले की प्रपंच लहान व सोपा वाटू लागतो.

**सर्वांभूती दयाशांति पै निर्धार।**
**तो योगी साचार जनी इथे।।**
**न लगे मुंडणे काया ही दंडणे।**
**अखंड कीर्तने हरि स्मरे।।**

या जगात सर्व प्राणीमात्राच्या ठायी दया आणि शांती ठेवणारा निश्चित योगी समजावा. असा सर्वत्र ईश्वर पाहणारा योगी होण्यासाठी मुंडण अथवा देहदंड करावा लागत नाही. केवळ अखंड हरिनाम कीर्तन करावे, सर्व जीवांत शिवात्मा वास करीत आहे. जीवमात्रांच्या ठायी दया, क्षमा, शांती, करुणामय वृत्ती ठेवावी. ज्याप्रमाणे सूर्य आकाशात प्रकाशतो आणि असंख्य नक्षत्रे लोप पावतात व तो एकटा सूर्य प्रकाशत राहतो. त्याप्रमाणे सर्व स्वरुपात आत्मा एकच आहे. चंद्र आकाशात येताच ज्याप्रमाणे पृथ्वीवरील कमळ उमलते. दोघांत एकच चैतन्य खेळत असल्यामुळे आनंद प्रकट होतो.

**जयाचेनि सुखे चळत पै विश्व।**
**नांदे जगदीश सर्वांघटी।।**

ज्याच्या इच्छेने सर्व जग चालते, तो जगदीश सर्वांभूती भरलेला आहे, त्याचे नाव हरि असे असून तोच या सर्व प्रपंच कल्पनांची बोळवण करतो. त्यांची शांती ही स्त्री, प्रकृती हा विकार आणि हृदयात उन्मनी अवस्था दृढ होते. निर्गुणाचे प्रेम मनात धरले की इंद्रियांच्या वासना नष्ट होतात, संपूर्ण शांती प्राप्त होते.

**हरिवीण भावो तो वायांचि संदेहो।**
**हरि देवा देवो आहे सत्य॥**

श्रीहरीवाचून इतर जो भाव तो व्यर्थ समजावा. देवाधिदेव हरि हाच खरा आहे. हरिजपाने यमाचे मोहजाल जीवाला बाधणार नाही. सर्वांच्या अंतरंगात श्रीहरी नांदत आहे. त्या श्रीहरिचे मी अखंड चिंतन करतो.

**ध्यान धरा हरि विश्रांति नामाची।**
**विठ्ठली साची मनवृत्ती॥**
**ध्यानेविण मन विश्रांतिविण स्थान।**
**सूर्याविण गगन शून्य दिसे॥**

श्रीहरिचे ध्यान करा. नाम हेच एक विश्रांतीस्थान समजा, म्हणजे मनाची वृत्ती विठ्ठलरूपी रंगून जाईल. ज्याप्रमाणे आकाशात सूर्य नसला तर आकाश शून्य दिसते. त्याचप्रमाणे ध्यानाशिवाय मन, विश्रांतीशिवाय स्थान समजावे. मनाची वृत्ती विठ्ठलमूर्तीकडे लावण्यापेक्षा विठ्ठल या तीन अक्षरांत वृत्ती ठेवावी. विठ्ठलनामाचा जप केला तर संसारनिवृत्त असे मन मुक्त होते. मी विठ्ठलकीर्तनात मन रमवितो. त्यामुळे माझे मन विठ्ठलमय होते, असे निवृत्तीनाथ म्हणतात.

**प्रपंचाची वस्ती व्यर्थ काहया काज।**
**आम्हा बोलता लाज येत सये॥**

हरिनामाशिवाय या संसारात वसती करणे काय उपयोगाचे? नामावाचून या प्रपंचात दुसरे काही बोलण्यास लाज वाटते. काय करावे? हा हरि कसा भेटेल? ज्याप्रमाणे चंद्र-सूर्य अमावस्येला एकत्र भेटतात. त्याप्रमाणे मन निरंतर हरिस्वरूपात एकरूप करू. तसेच आम्ही त्याचे निरंतर ध्यान करू आणि या ध्यानाने एकात्मतेची मनाची अवस्था हवी. हरिनामाचे पठण ही आमची वाट असून आम्ही नामस्मरणापुढे प्रपंच व्यर्थ मानतो.

**लटिका संसार वाहाविसी व्यर्थ।**
**विषयांचा स्वार्थ झणी करा॥**

संसार हा खोटा आहे. त्याचा भार विनाकारण कशाला वाहतोस? प्रपंच वाढवावा तसा विषयांचा स्वार्थ अधिक वाढत जातो. दुःखभाराने व्यर्थ शिणवू नको मन. शोक करू नकोस. एका निश्चयाने त्या एकमेव तत्वाकडे म्हणजे त्या ईश्वराकडे मन लाव. आपल्या हृदयरूपी घटात मन तदाकार करून त्या वनमाळी श्रीहरीचे स्मरण कर. चपळ वृत्तीचा मी काळवेळाचा विचार न करता नामस्मरणाच्या ठायी अचल राहिलो, असे निवृत्तीनाथ म्हणतात. कल्पना-वासनारूप काजळीने नको त्या कल्पित गोष्टी कवटाळील्या जातात, मग देव कसा जवळ येईल? कल्पना, वासनेचा, षड्विकारांचा त्याग करून अद्वैत अशा नारायणाला शरण जावे. मोहरूपी विनाशी सुखाने मोहीत न होता नारायणाचे सदैव चिंतन करावे. श्रीकृष्णाचे मधुर नामच सार वाटते. मी नामपठणाने श्रीहरीरूप झालो आहे. निवृत्तीनाथ म्हणतात-

**दिननिशीं नाम जपता श्रीहरीचे।**
**मग या मोहाचे मोहन नाही॥**

मोक्षाची इच्छा धरून जो मोहात गुंतला, त्याला गोपाळाचे स्मरण होणार कसे? श्रीहरीचे स्मरण केल्याने मोहाचे मोहकपण नाहिसे होऊन आतबाहेर सर्वत्र श्रीहरीच दिसेल. रात्रंदिवस श्रीहरीचे नामस्मरण करण्याने मोहबंध नष्ट होतात. बुद्धी-मतीला पडणारा मोह दूर करण्याचे साधन एकच आहे आणि ते म्हणजे सर्वत्र एकच

नारायण भरलेला आहे, हेच एक तत्व ओळखणे.

**तिमिर पडले प्रपंच हा भासे।**
**झाकलेला दिसे आत्मनाथ।।**
**हरिविण दुजे चिंतीता निभ्रांत।**
**अवघेचि दिसत मायाभ्रम।।**

अज्ञान अंधाराचा पडदा डोळ्यांवर असल्यामुळे हा सारा संसार खरा भासतो आणि आत्माराम, भगवंत झाकला जाऊन दिसत नाही. श्रीहरीशिवाय दुसरे चिंतन केले असता सर्वत्र मायेचा भ्रमच दिसतो. त्यासाठी हा अज्ञान-अंधकार झटकून टाकून सर्वत्र नारायण भरला आहे. त्याचे नामस्मरण नित्य करावे. प्रवृत्ती-निवृत्ती या बहिर्मुख वृत्ती सर्वत्र कार्यरत असतात. परंतु, नारायणाचे स्मरण केल्याने या वृत्ती आपल्या कानात हितकर तत्व सांगतात. आशेच्या भोगमग्न संसारात असताना हरिजप करावा. वासना, विकाराच्या सर्व वृत्ती गिळून टाकल्यावर रामनाम हिताचे असते.

**निंदा द्वेष चेष्टा या अभिमान भाजा।**
**सांडूनिया भजा केशवासी।।**

सर्व प्राणीमात्रांच्या ठिकाणी क्षमा धारण करणे ही क्षेत्रज्ञाची म्हणजेच जीवात्म्याची वृत्ती होय. अशा जीवात्म्याला सर्व जगत एकरूप हरिमय दिसू लागते. ज्या रुपात क्षमा, शांती व दया वास करते, त्याला हे सर्व जग आत्मरूप दिसते. निंदा, व्देष, चेष्टा या अभिमान उत्पन्न करणाऱ्या अवदसा आहेत. या सर्वांचा त्याग करून केशवाला भजावे. ह्या वासना विकाराच्या सर्व वृत्ती गिळून एकरूप तत्वावर ध्यान ठेवून भक्त समाधानी होतो. आम्ही चकोर हरि चंद्रमा।

**आम्ही कळा तो पौर्णिमा ।।१।।**
**कैसा बाहिजु भीतरी हरि।**
**बिंबे एकला एक सूत्री।।२।।**
**आम्ही देही तो आत्मा।**
**आम्ही विदेही तो परमात्मा।।३।।**
**ऐक्यपणे सकळ वसे।**
**द्वैत बुद्धी काहीं न दिसे।।४।।**
**निवृत्ती चातक इच्छिताहे।**
**हरि लागी वरते पाहे।।५।।**

आम्ही सर्व चंद्रकिरणे भक्षण करून तृप्ती पावणारे चकोर असून, तो श्रीहरी चंद्र आहे. आम्ही सर्व कळा, तर तो पौर्णिमा आहे. असा हा श्रीहरी आत व बाहेर कसा भरला आहे म्हणाल, तर तो एका सूत्रात बिंबला आहे. आम्ही देहधारी, तर तो आत्मा-विदेहस्थिती प्राप्त झाल्यावरही तो परमात्मा आमच्या ठिकाणी असणार. अशा ऐक्यरूपतेने तो सर्वत्र वास करतो. त्यात द्वैतबुद्धी दिसत नाही. जसा चातकपक्षी मेघधारा कधी पडतील, याची वाट पाहत मेघांकडे तोंड करून प्रतीक्षा करीत असतो, त्याप्रमाणे मी श्रीहरीकडे ध्यान लावून वर पाहात असतो.

**न पाहे यम काळ तयाकडे अवचिता।**
**नामाची सरिता ज्याचे मुखी।।**
**निवृत्ती नामामृत उच्चारी रामनाम।**
**नित्यता परब्रह्म त्याचे घरी।।**

ज्याच्या मुखातून रामनामरूपी अमृताची नदी अखंड वाहत आहे, तोच एक घट परिपूर्ण भरलेला

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

जाणावा. अखिल ब्रह्मांडाला वेसन घालणारा तो कळिकाळ या नामसामर्थ्यापुढे स्वतःसच वेसण घालून घेतो. नामभक्ताला तो पीडा करू शकत नाही. ज्याच्या मुखातून रामनामामृताचा उच्चार असेल, त्याच्या घरी परब्रह्माचा नित्य वास असतो. त्याच्या घरी प्रत्यक्ष परब्रह्म नांदते.

**परी तयांपाशी पांडवा। मी हरपला गिंवसावा।**
**जे नामघोषु बरवा। करिती ते माझे।। ज्ञा. ९/२०८**

जो वाणीने नित्य हरिनामाचा उच्चार करतो, तो धन्य असून या इहलोकात तोच शुद्ध पुण्य जोडणारा भक्त असतो. नाममंत्र जपणाऱ्याच्या सर्व पापांचे दहन होते. नामजपामुळे तो भाग्यवान ठरतो.

**नित्य नेम नाचे तोचि एक धन्य।**
**त्याचेचि शुद्ध पुण्य इये जनी।।**
**अमृती राहिला त्यासि कायसे मरण।**
**नित्यता शरण हरिचरण।।**

या भूलोकी रामनाममंत्राचा जो वाणीने अखंड जप करतो, त्यापेक्षा भाग्यवान दुसरा कोणी नाही. अमृतात राहणाऱ्याला मरण कसे येईल? जो हरिचरणी लीन असतो, त्याला अभय प्राप्त झालेले असते. नाममंत्र जपाने अनंत पुण्याच्या राशी जोडल्या जातात. रामनाम हे सर्व मंत्रांचे सार आहे. रामनामाचा जप करणाऱ्या भोळ्या भाविकाला या लोकी कोणीही शत्रू जिंकू शकणार नाही.

**राम नाही वाचे तो नर निर्दैव।**
**कैसेनी देव पावेल तया।।**
**जये नाम वाचे रामनाम पाहे।**
**जाशील वैकुंठे हरि म्हणता।।**

ज्याच्या मुखी कधीच रामनाम येत नाही, तो दुर्दैवी होय. त्याला दैव कसे बरे फलदायी होणार? वाणीने रामनाम जप करावा. हरिस्मरणाने वैकुंठ प्राप्त होईल. रामनाम हा बीजमंत्र जपणाऱ्यांकडे प्रत्यक्ष कळिकाळही दृष्टी टाकणार नाही.

**नामाचेनि बळे तरिजे संसार।**
**आणिक विचार करू नको।।**
**नाम जपा वेगी म्हणे हरिहरी।**
**प्रपंच बोहरी आपोआप।।**

देवाचे नामस्मरण हीच शक्ती. या शक्तीनेच संसार तरून जाईल. रामनाम चिंतनाशिवाय दुसरा विचार करू नका. नामस्मरणाचा महिमा अनादी काळापासून आहे. नामसंकीर्तनाचे आद्यप्रणेते श्री नारदमुनी सतत 'नारायण नारायण' असे नामोच्चार करीत तिन्ही लोकात संचार करीत होते. त्यांचेच शिष्य भक्त प्रल्हाद, ध्रुव, वाल्या कोळी, शबरी, बिभीषण, विदूर, उद्धव, सुदामा यांनी नामभक्ती करून ईश्वर उपासना केली. कलीयुगात अनेक संत महात्मे नामस्मरणाची महती गात उद्धरले. वारकरी, नाथ संप्रदायी, रामदासी आदि सांप्रदायकि भक्त नाममहिमा गात असत. निवृत्ती, ज्ञानराज, नामदेव, एकनाथ, तुकाराम आदि संतांनी नामस्मरण भक्तीचा प्रचार करीत हरिपाठ गायिले आहेत. हरिपाठातून आत्मज्ञानही प्रकट केले आहे. सद्‌गुरू निवृत्तीनाथांना व श्रीहरी भगवंताला वंदन!

**- नामदेव सदावर्ते,**
पसायदान बंगला, मखमलाबाद
नाशिक

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



## काम क्रोध दैत्यावर कोरडा कडाडा वाजतो

**अभंग, भारुड, जोगवा, गवळणी, गोंधळ अशा लेखन प्रकारांतून नाथांनी परिणामकारक-प्रभावी जनजागृती, प्रबोधन केले. त्यांच्या साहित्याच्या माध्यमातून रंजन आणि प्रबोधन वेगळ्या स्वरुपात साकारले, साध्य झाले. भागवत पुराणातील एकादश स्कंदावरील टीका स्वरूपात 'एकनाथी भागवत' हा भाविक- अभ्यासकांमध्ये अत्यंत लोकप्रिय ठरलेला महान ग्रंथ नाथांच्या लेखनीतून उतरला! 'त्रिगुणात्मक त्रिमूर्ती दत्त हा जाणा' ही विख्यात आरती संत एकनाथांचीच.**

**-डॉ. सुनील शिंदे**

**मा**उली संत ज्ञानदेवांनंतर २५० वर्षांनंतरचा संत एकनाथांचा जन्म. नाथांना आई-वडिलांचा सहवास फार काळ नाही लाभला. चक्रपाणी आणि सरस्वती या आजोबा-आजींनी त्यांचा सांभाळ केला, पालनपोषण केले.

सक्षम, उदार, आनंदी, सर्जनशील, भाग्यवान-अनुकूल असा 'एकनाथ' या नामाचा आशय. तो नाथांनी पुरेपूर सार्थ ठरवला! विपुल लेखन, संशोधन, लोकजागृती, प्रबोधन ही त्यांची अनमोल-तोलामोलाची कामगिरी. 'बये दार उघड' असे म्हणत संत एकनाथांनी अभंग, भारुड, जोगवा, गवळणी, गोंधळ अशा विविध रचना प्रकारात प्रबोधनाचा झेंडा फडकवत ठेवला. 'एकनाथी भागवत' हा त्यांचा लोकप्रिय ग्रंथ. 'ज्ञानेश्वरी' ची प्रत अत्यंत परिश्रमपूर्वक त्यांनी दुरुस्तीसह शुद्ध केली.

सन १५३३ ते १५९९ हा संत एकनाथांच्या जीवनाचा कालपट. संत भानुदास हे नाथांचे पणजोबा. एकनाथ महाराजांचे सद्‌गुरू जनार्दन स्वामी हे देवगड (देवगिरी) दरबारी अधिपती म्हणून होते. महान दत्त उपासक म्हणून त्यांची ख्याती होती. नाथांनीही अत्यंत परिश्रमपूर्वक, कमालीच्या निष्ठाभावनेने गुरू जनार्दन स्वामींची सेवा केली.

साक्षात् दत्तात्रेयांनी एकनाथ महाराजांना प्रत्यक्ष दर्शन दिले. नाथांचे गुरु महात्म्य, तसेच दत्तभक्ती एवढी थोर की, खुद्द दत्तगुरु द्वारपाल म्हणून नाथांच्या दारी उभे असत, अशी त्यांची कीर्ती सांगितली जाते! नाथांनी विपुल तीर्थयात्रा केल्याची अपार ख्याती आहे. प्रख्यात संतकवी मुक्तेश्वर हे एकनाथांचे मुलीकडून असलेले नातू होत.

अभंग, भारुड, जोगवा, गवळणी, गोंधळ अशा लेखन प्रकारांतून नाथांनी परिणामकारक-प्रभावी जनजागृती, प्रबोधन केले. त्यांच्या साहित्याच्या माध्यमातून रंजन आणि प्रबोधन वेगळ्या स्वरुपात साकारले, साध्य झाले. भागवत पुराणातील एकादश स्कंदावरील टीका स्वरूपात 'एकनाथी भागवत' हा भाविक- अभ्यासकांमध्ये अत्यंत लोकप्रिय ठरलेला महान ग्रंथ नाथांच्या लेखनीतून उतरला! 'त्रिगुणात्मक त्रिमूर्ती दत्त हा जाणा' ही विख्यात आरती संत एकनाथांचीच.

साहित्य, भारुडे, लोकभक्तीपर रचना आणि प्रत्यक्ष व्यक्तिशः कृतीशील स्तरावर नाथांनी जातिभेद, जातीव्यवस्था दूर करण्यासाठी प्रयत्नशील राहून मोलाचे कार्य केले, ही लक्षणीय-संस्मरणीय बाब! संत ज्ञानदेवांच्या 'ज्ञानेश्वरी' निर्मितीच्या २५० वर्षांनंतर संत एकनाथांकडून ज्ञानेश्वरीच्या उपलब्ध प्रतीचे झालेले शुद्धीकरण-संस्करण आणि आळंदी येथील ज्ञानदेवांच्या समाधी स्थळाचा शोध, ही दोन मोलाची

कार्य ठरली. मूळात 'ज्ञानेश्वरी'तील काही ओव्या, तसेच अनेक शब्द बरेच लोक अशुद्ध उच्चारण-लेखन करून आशयच बिघडवून टाकत! या अर्थाने नाथांकडून झालेले शुद्धीकरण तोलामोलाचे ठरते.

एकनाथी अभंग गाथा, आनंदलहरी, अनुभवानंद, चिरंजीवपद, एकनाथी भागवत, चतुःश्लोकी भागवत, (तब्बल ४० हजार ओव्या समाविष्ट असलेले) भावार्थ रामायण, रुक्मिणी स्वयंवर, लघुगीता, शुकाष्टक टीका, हरिपाठ अभंग (२५) ही नाथांची प्रमुख ग्रंथसंपदा!

नाथ महावैष्णव होते. श्री गुरुदत्त भक्त होते. देवीचे उपासक होते. विशुद्ध भावभक्ती आणि आध्यात्मिक लेखनातील संशोधकीय बाणा त्यांनी जाणीवपूर्वक जपला. आदिमाया भगवती ही अनादि सिद्ध असा उल्लेख करताना संत एकनाथ 'महालक्ष्मी' या रचनेत षडविकाररुपी दैत्यावर कडाडा वाजणाऱ्या कोरड्याचा निर्देश करतात. 'बया दार उघड' असा पुकारा करतात.

**नमो आदिमाया भगवती।**
**अनादि सिद्ध मूळ प्रकृती।**
**महालक्ष्मी त्रिजगती।**
**बया दार उघड दार उघड।**
**काम क्रोध दैत्यावर कोरडा कडाडा वाजतो।**
**ज्ञान पोत पाजळतो। बोध परडी हाती घेतो।।**

- संत एकनाथ

खऱ्या अर्थाने सक्षमपणे, सर्जनशील जाणीवेतून उत्तुंग कामगिरी करणाऱ्या नाथांना प्रणाम, दंडवत.

**-डॉ. सुनील शिंदे,**
'दत्त सुकृत', व्हेलेंसिया रेसेडेन्सी
ए-१, फ्लॅट नं. १०४, पहिला मजला,
अगस्ती साखर कारखाना रोड
अकोले : ४२२ ६०१, जि. अहमदनगर
(मो. ९४२३०४५३४२)

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



## समाधान

समाधान या गोष्टीवर संतांनी फार भर दिला आहे. जोपर्यंत मनुष्य समाधानी होत नाही, तोपर्यंत त्याच्या जीवनाला अर्थ प्राप्त होत नाही. जोपर्यंत जीवनाला अर्थ प्राप्त होत नाही, तोपर्यंत जगण्याचा आनंद उपभोगता येत नाही. जोपर्यंत जगण्यातील आनंदरस पीत नाही, तोपर्यंत आयुष्य हे सर्वसामान्य प्राण्याच्या जीवनाच्या पलीकडचे नसेल. याचा अर्थ असा नव्हे की, इतर प्राणी समाधानी नाहीत. इतर प्राणी समाधानी असतात, म्हणून तर नियतीने त्यांना अल्प आयुष्य देऊन विविध जन्म देत त्यांच्यासाठी मुक्तीचा मार्ग सुलभ केला आहे. याचा अर्थ इतर प्राण्यांपेक्षा मनुष्याला हीन म्हणायचे का?

**- बंडोपंत कुलकर्णी**

**स**ध्याचे जग हे अपेक्षेचे ओझे घेऊन वेळेच्या पुढे निष्फळ धावणारे आहे. त्यामुळे नित्याची धडपड व उपजत भाव-भावनेकडे लक्ष नाही व सुखाची अभिलाषा धरून मृगजळाने तहान भागविण्याच्या प्रयत्नात मनुष्य झुरत आहे. यातून मनुष्याच्या अंतरंगी ताण-तणाव, मानसिक असंतुलन आणि मनोविकार वाढत आहेत. अशा विकाराने अंतरंगाला निलायम करून स्थायी झालेला पांडुरंग मनःचक्षूत येत नाही. याउलट संसारविषय सुखाचे नानाविध रंग नजरेत भरल्याने खरा तो एक रंग कळत नसल्याने भ्रामकता वाढीस लागली आहे. याच भ्रामकतेमुळे माणूस समाधानी नसल्याचा निष्कर्ष काढला जातो. समाधान ही प्रवृत्ती नाही. समाधान ही एक अवस्था आहे. भ्रामकता व संभ्रम अशा मानसिक किल्मिषतेत समाधानाला सुखाभिलाषी वृत्ती व विषयाधीन मनाच्या दैनंदिन व्यवहाराशी जोडले जाते. मानवी जीवनाचे सार समाधानात आहे. म्हणून समाधान ही अवस्था समजून घेतली पाहिजे व मनाला त्या अवस्थेत आणण्याचा निखळ प्रयत्न केला पाहिजे, तरच खरे समाधान होईल. तुकोबाराय यांच्या रचनेत एक ओवी आहे. लोक त्या ओवीचा उच्चार नेहमी प्रत्यक्ष वर्तमान परिस्थितीला जोडून करतात. ती म्हणजे -

**ठेविले अनंते तैसेचि रहावे।**
**चित्ती असो द्यावे समाधान।।**

एकदा माझ्या हाती जुन्या वर्तमानपत्रातील काही पाने लागली होती. त्यावर धार्मिक सदर होते. त्यात एका महाशयांचा लेख होता. त्यांचे नाव आज मला आठवत नाही. त्यांनी असे लिहिले होते की संतांनी 'ठेविले अनंते तैसेचि रहावे। चित्ती असो द्यावे समाधान।।' असा अभंग लिहून लोकांना आळशी बनविले. ते महाशय अनुभवहीन होते. त्यांना संतांचे मन आणि भाषा कळली असती, तर त्यांनी तसे लिहिले नसते. बोलता व लिहिता येते म्हणून काही बरळायचे वा लिहायचे नसते. लिखाण तात्त्विक दृष्ट्या बुद्धीवर आघात करणारे असावे. बालबुद्धी समजून त्या महाशयांकडे दुर्लक्ष केलेले बरे. याचा अर्थ आपण संतांनी सांगितले, ते सहज न स्वीकारता संतमन जाणण्याचा प्रयत्न केलाच पाहिजे. संतमन जाणण्याचा कसोशीचा प्रयत्न म्हणजे साधना होऊ शकते व मती भावप्रकाशाने उजळून येऊ शकते.

समाधान या गोष्टीवर संतांनी फार भर दिला आहे. जोपर्यंत मनुष्य समाधानी होत नाही, तोपर्यंत त्याच्या

जीवनाला अर्थ प्राप्त होत नाही. जोपर्यंत जीवनाला अर्थ प्राप्त होत नाही, तोपर्यंत जगण्याचा आनंद उपभोगता येत नाही. जोपर्यंत जगण्यातील आनंदरस पीत नाही, तोपर्यंत आयुष्य हे सर्वसामान्य प्राण्याच्या जीवनाच्या पलीकडचे नसेल. याचा अर्थ असा नव्हे की, इतर प्राणी समाधानी नाहीत. इतर प्राणी समाधानी असतात, म्हणून तर नियतीने त्यांना अल्प आयुष्य देऊन विविध जन्म देत त्यांच्यासाठी मुक्तीचा मार्ग सुलभ केला आहे. याचा अर्थ इतर प्राण्यांपेक्षा मनुष्याला हीन म्हणायचे का? मनुष्यप्राणी हीन नाही. उलट मनुष्यजन्म हा दुर्लभ आहे. इतर प्राण्यांचे समाधान व मनुष्याचे समाधान यात फरक आहे. इतर प्राणी हे आहार, निद्रा, भय आणि मैथुन यात सीमित आहेत. या पलीकडे त्यांच्यात विचारप्रवाह नाही. वानरराज हनुमान व वानरसेना पक्षी जटायु यांनी पुरूषोत्तम श्रीरामाला मदत केली. मग वानर, जटायु, वगैरे प्राणी व पक्षी यांनी आहार, निद्रा, भय आणि मैथुन याच्या पल्याड जाऊन विचार केला नाही का? असा प्रश्न पडेल. घरातील पाळीव प्राणी प्रेम व आपुलकीने माणसाळतो व घरातील लोकांवर प्रेमही करतो व त्यांच्या बोलण्याप्रमाणे व्यवहार करतो. म्हणून पाळलेले प्राणी विचारवंत झाले, असे म्हणता येणार नाही.

हनुमान यांना वानरराज म्हटले तरी ते सध्या वावरतात त्या वानरांपेक्षा वेगळे म्हणजे वानर व मनुष्य यांना संयुक्तरित्या साम्यता दर्शविणारी वानरसेना प्रजाती असावी. फारतर वनात वास्तव्य करून राहणारे पुच्छधारी विचारवंत मानवांना वानर म्हटले असतील. म्हणून बजरंगबली हनुमान हे दासोऽऽहम, कोऽऽहम आणि सोऽऽहम निष्णात रामभक्त होते. जटायु हे रामभक्त होते. म्हणून एखाद्या विशिष्ट वर्गात गणना केली म्हणून त्यांना तसेच संबोधले जाऊ नये. शिवाय प्रत्येक गोष्टीला अपवाद असतात. सर्व वानर हे हनुमान झाले नाहीत वा सर्व पक्ष्यांनी जटायुसम विचार केला नाही.

आहार, निद्रा, भय, मैथुन हे मनुष्यातही पूर्णपणे भरलेले आहेत. काही मनुष्य जन्मतःच वेडे असतात व काही नंतर मानसिक रसायन बिघाडाने नंतर वेडे होतात. वेड्या मनुष्याची मनुष्यात गणना होत असली तरी अप्रत्यक्षपणे त्याची गणना विचारवंत मनुष्यात केली जात नाही. जरी नंतर वेडा झाला असेल तरीही तो नियती इच्छित मनुष्य जन्माला अपवाद ठरतो. म्हणून वेडा हा मनुष्यजन्माला अपवाद ठरतो. तथापि, जन्मलेल्या प्रत्येकाला जगण्याचा अधिकार आहे, तसा वेड्यालाही आहे. आहार, निद्रा, भय, मैथुन याशिवाय जीवनप्रणालीवर रूढ होण्यासाठी मन, विचार प्रवृत्ती व त्यावर कार्य करण्याची बुद्धी, कुशलता मनुष्यात ठासून भरलेली आहे. म्हणून आज संसारात जे चांगले-वाईट बदल दिसतात, ते मानवी मन, विचार, बुद्धी आणि कृती यामुळेच घडलेले दिसतात. याच कारणांमुळे मनुष्य हा समाजात सर्वोत्तम म्हणवून घेतो व याच कारणांच्या अतिरेकामुळे समाजातील हीन स्तरावर जातो. याशिवाय विकृत मानसिकतेमुळे वेडा होऊन मनुष्य जन्माला अपवादही ठरतो. म्हणून तर मनुष्यजन्म दुर्लभ म्हणतात. माऊली म्हणते, आहार, निद्रा, भय, मैथुन याच्या पलीकडे माणूसपणा आहे. हे सांगताना म्हणते-

**दुर्लभ रे दुर्लभ रे दुर्लभु संसारु कां नेणा।**
**आहारनिद्रेसाठीं दवडितां माणुसपणा।।**

संत कबीर म्हणतात,

**दुर्लभ मानुष जन्म है, देह न बारम्बार।**
**तरुवर ज्यों पत्ता झड़े, बहुरि न लागे डार।**

नामदेव महाराज म्हणतात,

**दुर्लभ मनुष्य जन्म न लाभेरे मागुता।**

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

लाहो घ्या सर्वथा पंढरीचा।।

जगद्गुरू तुकोबाराय म्हणतात,

**आयुष्य वेचूनि कुटुंब पोसिलें।**
**काय हित केलें सांग बापा।।**
**फुकाचा चाकर जालासी काबाडी।**
**नाहीं सुख घडी भोगावया।।**
**दुर्लभ मनुष्यजन्म कष्टें पावलासी।**
**दिला कुटुंबासी कामभोग।।**
**तुका म्हणे ऐसें आयुष्य नासिलें।**
**पाप तें सांचिलें पतनासी।।**

**तुकडोजी महाराज म्हणतात,**

**केली आहे देवे कृपा।**
**तरीच आलो मानवरूपा।।**
**उपकार सांगो किती।**
**मी तो दिन अल्पमती।।**
**घडे भक्ती या देहाने।**
**हे तो देवाचेचि देणे।।**
**तुकड्यादास सदा दीन।**
**पुरवी आस नारायण।।**

इतर प्राण्यांच्या जीवनापेक्षा मनुष्यप्राण्याचे जीवन वेगळे आणि विरळा आहे. आहार, निद्रा, भय, मैथुन या गुणांचा उपयोग करताना माणूस समाधानी व्हावा हे संतांचे सांगणे आहे. मग समाधान म्हणजे काय? भरपूर धन-दौलत, शेती, शेतात पाणी, बैलबारदाना, व्यावसाय, भरपूर पैसा, गडगंज श्रीमंती, मुबलक घरगडी, नोकर, चाकर, आरामदायी वागणं वगैरे यातून मिळणाऱ्या सुखाला समाधान म्हणावे का? जर या गोष्टींना समाधान म्हणायचे, तर संत याच्या विपरित सांगतात. संत समाधान या अवस्थेला वेगळ्या दृष्टीने पाहतात. संत तुकोबाराय म्हणतात,

**चित्त समाधान।**
**तरी विष वाटे सोनें।।**

सोने, चांदी, पैसा, धन, दौलत वगैरे सर्व सुखवस्तूंपेक्षा समाधान ही अवस्था मोठी आहे. इतकेच नव्हे, तर समाधान या अवस्थेपुढे धनदौलत, पालापाचोळा व विषासम आहे, असे संतांचे म्हणणे आहे. वैराग्य शतकात राजा व यती यांचे संवादरूप एक संस्कृत सुभाषित आहे.

**वयमिह परितुष्टा वल्कलस्त्वं दुकूलैः सम इव परितोषो निर्विशेषो विशेषः।**
**स तु भवतु दरिद्रो यस्य तृष्णा विशाला मनसि च परितुष्टे कोऽर्थवान् को दरिद्रः।।**

हे राजा, आम्ही या वल्कलांनी संतुष्ट आहोत, तर तू रेशमी वस्त्रे धारण केल्याने संतुष्ट आहेस. दोघांचा संतोष सारखाच आहे. त्यात वेगळेपणा नाही. खरोखर ज्याची हाव संपत नाही, तोच दरिद्री असतो. मन संतुष्ट असेल तर कोण श्रीमंत आणि कोण दरिद्री?

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

समाधान कसे आणि कुठे, याबाबत माऊली म्हणते-

**सुख श्रृंगार सुहावा।**
**मिरवितो हरि समाधान बोधु रे।।**
**हरिचे सुख गीती गातां।**
**समाधान बोधु रे।।**
**बापरखुमादेविवरु विठ्ठलु रे।**
**आठवितां समाधान बोधु रे।।**

माऊलींच्या भाषेत समाधान हे हरीला सुख आणि श्रृंगार जाणणाऱ्या बुद्धीत, समाधान हे हरीच्या गीतात आणि विठ्ठल अवस्था धारण केलेल्या बुद्धीत आहे.

संत नामदेव म्हणतात -

**निवृत्तिदेव म्हणे करितां समाधान।**
**काही केल्या मन राहात नाही।।**

मनाचे समाधान करण्याचा प्रयत्न करतो, पण मन शांत रहात नाही, असे महाराज म्हणतात. याचा अर्थ समाधान हे कोणत्याही बाह्य गोष्टींवर अवलंबून नाही, तर ते आंतरिक घडामोडींवर आहे. जरी अंतरंगी वा आंतरिक घडामोडी या बाह्य गोष्टींमुळे भासत असल्या तरी मन बाह्य गोष्टींना कोणत्या विचाराने स्वीकार करते, यावर समाधान अवलंबून आहे. संत एकनाथ महाराज म्हणतात-

**प्रेम सुख देई प्रेम सुख देई।**
**प्रेमे विण नाहीं समाधान।।**

प्रेम हे अंतःकरणात उमलणारे फुल आहे. त्याचा सुगंध आतून बाहेर येतो व त्या सुगंधात तो मादक द्रव्य प्राशन केल्यासम मुग्ध होतो. ज्याच्या अंतरंगी प्रेमफुल उमलले, अशी व्यक्ती जिकडे जाईल, तिकडे त्याच्या अगोदर तिथे त्याच्या प्रेमाचा सुगंध पसरलेला असतो. म्हणून त्याला सर्वत्र प्रेमच प्रेम जाणवते. त्याच्या प्रेमाच्या सुगंधाच्या क्षेत्रात आलेल्या मनुष्य, विषय, दृश्य, अदृश्य, प्राणी वगैरे प्रत्येक भूत आणि गोष्टीत त्याला प्रेम जाणवते. त्याच्या दृष्टीतील भेदभाव संपुष्टात येतो. भेदभाव संपुष्टात येणे यात समाधान असल्याचे संत सांगतात.

प्रज्ञाचक्षू गुलाबराव महाराज एके ठिकाणी लिहिताना म्हणतात, जितक्यांना जेवता येते तितक्यांना स्वयंपाक करता येतो, असा नियम नाही; पण जितक्यांना स्वयंपाक करता येतो तेवढ्यांना जेवता मात्र येते. त्याप्रमाणे जितक्यांना समाधान पाहिजे असे वाटते तेवढ्यांना मन जिंकता येते असे नाही, पण जितक्यांना मन जिंकता येते तितक्यांना समाधान असतेच. म्हणजेच समाधान ही मनाची व त्याद्वारे अंतःकरणात घडणाऱ्या क्रियेवर समाधान अवलंबून आहे.

मनाचे समाधान, संतोष हा बाह्यवस्तूंच्या साठवणूक करण्यात किंवा त्याचे स्वामित्व स्वतःकडे ठेवण्यात नसते. क्षणिक समाधान मनाची एक वृत्ती आहे व त्याला प्रवृत्तीत परिवर्तीत करता नित्य समाधान प्राप्त होते.

**ठेविले अनंते तैसेचि रहावे। चित्ती असो द्यावे समाधान।।**

असे अभंग लिहून खरंच संतांनी लोकांना आळशी बनविण्याचा प्रयत्न केला का? संतांनह तसे सांगितले नसते तर तेच तुकोबाराय 'प्रपंच करोनी परमार्थ साधावा। वाचे आळवावा पांडुरंग।' असे म्हटले असते का? संत सावता माळी स्वतः सतत कर्म करीत राहिले व त्यांनी पंढरपूर येथे न जाता कांदा-मुळा-भाजी यात पांडुरंग

शोधला. समाधान ही आंतरिक वृत्ती आहे. समाधान आणि समाधी या दोन शब्दांत फारसे अंतर असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे समाधी समजून घेतली असता समाधान समजेल. यासंदर्भात माऊलींचा एक अभंग आहे.

**समाधि हरिची सम सुखेंवीण।**
**न साधेल जाण द्वैतबुद्धि।।**
**बुद्धीचें वैभव अन्य नाहीं दुजें।**
**एका केशवराजें सकळ सिद्धि।।**
**ऋद्धि सिद्धि निधी अवघीच उपाधि।**
**जंव त्या परमानंदीं मन नाहीं।।**
**ज्ञानदेवी रम्य रमलें समाधान।**
**हरिचें चिंतन सर्वकाळ।।**

द्वैतबुद्धी संपुष्टात येते तेव्हा बुद्धीचे वैभव वाढते. कारण अभेद बुद्धीत परमात्म्याचा अविर्भाव होतो, तेव्हा मन परमानंदाने व्यापून जाते. त्या आनंदापुढे सर्व ऋद्धी-सिद्धी तुच्छ ठरतात. ते व्यापलेले मन परमानंदातून बाहेर पडण्याचा प्रयत्न करीत नाही आणि तेथे त्याला समाधान प्राप्त होते, असे माऊली सांगते.

समाधी म्हणजे निष्क्रिय मन आणि देह अवस्थेत जाऊन हिरण्यगर्भाशी म्हणजे वैश्विक मनाशी एकरूप होणे. वैश्विक मनाशी एकरूप वा तादात्म्य पावता स्वतःचे अस्तित्व उरत नाही. स्वतःच्या अस्तित्वाचे भान असले, तरी ते हिरण्यगर्भाच्या मनाचे अंशात्मक भान ठरते. म्हणून आध्यात्मिक साधनेत समाधी याला महत्त्व आहे. परमात्म अनुभूतीसाठी अष्टांगयोग साधना व नवभक्ती असल्या तरी सर्वांचा शेवट समाधी अवस्थेत येऊन होतो. समाधी अवस्था म्हणजे डोळे मिटून एकांतात बसणे नव्हे. समाधी म्हणजे संपूर्ण विश्वाचे सम्यक, निर्मळ आणि निर्भेळ ज्ञान होणे. जागतेपणी देहाचा विसर पडून सर्वांकडे समदृष्टीने पाहात मनाचा कारभार आणि त्यातून बुद्धीने निवडलेले सनातन सत्य याची परिपूर्ण ज्ञान अवस्था ही समाधी अवस्था होय. ही प्रत्येक मनुष्याला एकदा अनुभवाला येते, पण बुद्धीचा विकास झालेला नसल्याने ते स्मरणात राहात नाही. जसे आपला जन्म झाला तेव्हापासून ते समज येईपर्यंतचा काळ हा जणू विदेहकाळच असतो. त्या वयात देहाचे भान कमी असते. म्हणून तर मूल हे फूल समजून आगीचा निखारा पकडण्याचा प्रयत्न करते. जीवनाची सार्थकता सामान्य लोकांना समजावून सांगण्यासाठी संतांनी अनेक युक्त्या व रूपके उपयोगात आणली. ठेविले अनंते तैसेचि राहावे। ही उक्ती युक्तीपूर्ण आहे. आत्मा अमर आहे. म्हणजे येथे देहाचा जन्म आणि आत्म्याचे अवतरण घडत असते. जीवन देहाशी निगडीत नसून, आत्म्याशी संबंधित आहे. आत्म्याचा उद्धार आध्यात्मिक साधनेत अभिप्रेत आहे. म्हणून देह हे आत्मोद्धारासाठी माध्यम आहे. आपण आत्मा असून देहाच्या आश्रयाने येथे अवतरीत होतो. तथापि, भ्रामकतेमुळे देहाचा जन्म आत्म्याला जोडला जातो. संतांनी ठेविले अनंते असे म्हणत सध्याच्या परिस्थितीबाबत सांगितले नसून, आपणास या ब्रह्मांडात आत्मरूपाने परमेश्वराने ठेविले त्या क्षणाला उद्देशून सांगत आहेत. म्हणजे आपला आत्मा अवतरित झाला व त्याचा वाहक या देहाचा जन्म झाला त्यावेळी या देहातील चोवीस तत्त्वे सम होती, त्यांच्यात विसंगती नव्हती व गुण्यागोविंदाने आपले कार्य करीत होती. मनाचा कारभार सुरू झाल्यावर षड्गुण व षडरिपू यांचा कारभार सुरू झाला व त्यांच्या कमीजास्त वृत्तीमुळे आंतरिक रासायनिक बिघाड सुरू झाल्यावर मन बाह्यांग व दृश्यावर विसंबून कार्यरत होऊन असमाधानी होते. समाधान या शब्दाची संधी सोडविता सम म्हणजे समान आणि अधान म्हणजे ठेवणे असा होतो. ठेविले त्यावेळी

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

सम गुण धारण केलेल्या चोवीस तत्त्वांना पुन्हा सम अवस्थेत आणण्याचा प्रयत्न करावा, असे संतांचे सांगणे आहे. ठेविले अनंते तैसेचि रहावे म्हणजे आत्म अवतरण व देहाचा जन्म झाला त्यावेळी जी मनाची अवस्था होती, त्या अवस्थेत जाणे म्हणजे समाधान होय. याचे एक प्रत्यक्ष उदाहरण पाहून लेखाला विराम देऊ.

तुमचा मित्र तुमचे वाहन घेऊन गेला आणि चार तासांत परत येतो असे सांगितले. आपण चार तास निश्चित राहतो. चार तास उलटून गेल्यावर मनाची घालमेल सुरू होते. जसजसा वेळ जाईल आणि वाहन परत आले नाही तेव्हा मन नको ते वाईट विचार करू लागते. प्रथमतः वाहनात बिघाड झाला असेल, असा विचार. आणखी वेळ जाता पोलिसांनी पकडले तर नसेल, असा विचार येतो. आणखी वेळ गेल्यावर गाडी चोरीला तर गेली नसेल, असा विचार येतो. आणखी उशीर झाल्यावर वाहनाचा अपघात तर झाला नसेल, असाही मन विचार करते. अशा अनेक विचारांनी मन अस्थिर होते व देहात रासायनिक उलथापालथ होऊन मानसिक व देहीक स्वास्थ्य बिघडते. म्हणजे वाहन घेऊन गेल्यावर परत येण्याचे आश्वासन दिलेले चार तास तो वाहनाचा प्रसंग जन्माला आला त्यावेळची समाधान अवस्था ठरते. जसजसा वेळ निघून जात होता व उशीर होत होता, ती असमाधान अवस्था. रासायनिक बिघाडाने झालेली देहीक व मानसिक अवस्था समोर मित्र व वाहन नजरेला पडताक्षणी आनंद होऊन संपून जाते व देहीक व मानसिक अवस्था मित्राला वाहन दिले त्या क्षणाला येते. म्हणजेच वाहनाच्या प्रसंगाचा जन्म झाला त्या अवस्थेत मन येते व मनुष्य तेथे समाधानी होतो. म्हणजे ज्या क्षणी आपला जन्म झाला, त्या अवस्थेत मनाला नेणे व वय वाढले असले तरी जन्म झाला त्या अवस्थेत असलेल्या मनाने संसाराकडे पाहून प्रपंच करणे म्हणजे समाधान अवस्था होय. संतांनी लोकांना आळशी केले नाही. उलट त्यांनी लोकांना जीवनाची सार्थकता सांगताना संसाराकडे कसे पहावे व प्रपंच कसा करावा, याचे शिक्षण दिले. संत म्हणजे -

**लेकुराचे हित। पाहे माऊलीचे चित्त।।**
**ऐसी कळवळ्याची जाती। करी लाभाविण प्रीती।।**
**पोटी भार वाहे। त्याचे सर्वस्वही साहे।।**
**तुका म्हणे माझे। तुम्हा संतावरी ओझे।।**

म्हणून संतांची शिकवण ही मनुष्याला सन्मार्गावर ठेवते व नैतिक गाभाऱ्यात मनाला न्हाऊ घालत राहते. संतांच्या शिकवणीचे अनुसरण व आचरण यातच सम्यक समाधान आहे.

**कृष्णार्पणमस्तू। आत्मा मालिक।**

**– बंडोपंत दि. कुलकर्णी,** सोलापूर
(जिल्हा न्यायधीश, पुणे)

***



## आठवणीतील सत्संग यात्रा

**प. पू. गुरूदेव माऊलींच्या सानिध्यात विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्टच्या वतीने रेल्वे, विमानाद्वारे अनेक सत्संगयात्रा काढण्यात आल्या आहेत. सन २००० ते २०१७ दरम्यान स्पेशल रेल्वेने भारतातील विविध प्रमुख तीर्थक्षेत्रांना भेटी देण्यात आल्या. हजारो भाविकांनी या सत्संग यात्रांचा लाभ घेतला.**

**- बी. के. गायकवाड**

**प.पू.** गुरूदेव माऊलींच्या सानिध्यात विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्टच्या वतीने रेल्वे, विमानाद्वारे अनेक सत्संगयात्रा काढण्यात आल्या आहेत. सन २००० ते २०१७ दरम्यान स्पेशल रेल्वेने भारतातील विविध प्रमुख तीर्थक्षेत्रांना भेटी देण्यात आल्या. हजारो भाविकांनी या सत्संग यात्रांचा लाभ घेतला.

या सत्संग तीर्थयात्रांतून तीर्थाटनाबरोबर भारतातील विविध प्रदेशांतील भूमीदर्शन, तेथील नद्या-पर्वत, वृक्ष-वने, अथांग समुद्राचे किनारे, निसर्ग सौंदर्यासोबत स्थानिक रहिवासी लोकांचे राहणीमान, लोकसंस्कृती यांचे यथार्थ ओझरते दर्शन व या सर्वांमधील सुंदर निरामय आविष्काराचे दर्शन, हे सर्व भाविकांना अनुभवता आले.

यात्रा प्रवासादरम्यान मुक्कामाच्या ठिकाणी भक्तांकडून प. पू. सद्‌गुरू व संतांच्या सानिध्यात, तसेच स्थानिक लोकांसमावेत सत्संग, भजन, प्रवचनांचे कार्यक्रम होत असे. याचा सर्वांना आत्मिक आनंद प्राप्त होई. आरक्षित स्पेशल रेल्वेत जेवण-नाश्त्यासाठी भोजन तयार करण्याच्या डब्याची सोय होती. सर्वांना जागेवर जेवण-नाश्ता मिळे. तर, मुक्कामी यात्रेतील सहभागी आश्रम पदाधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली व आश्रमातील स्वयंपाकी पथक स्वयंशिस्तीने प्रसाद भोजनाची सर्व व्यवस्था पाही. सत्संग यात्रेकरूंसाठी मुक्कामी निवासाची उत्तम व्यवस्था नियोजित सत्संग यात्रेच्या महिनाभर अगोदर करण्यात येई. ती उपलब्धतेनुसार चांगली हॉटेल्स, सर्व सोयींयुक्त असलेली समाजकार्यालये अथवा धर्मशाळा येथे करण्यात येई.

भाविकांना आपल्या प्रपंचातील दैनंदिन जीवनातील कार्यबंधनातून काही काळ का होईना विसर पडून थोडेसे अलिप्त करून, मनाला संसारिक माया-मोह बंधनापासून दूर करून त्यांना परमार्थाकडे ओढ लागावी यासाठी ह्या सत्संग तीर्थयात्रा अत्यंत उपयुक्त असल्याचे संत प्रवचनातून सांगत. उत्तर भारतातील हिमालयातील अमरनाथपासून दक्षिण भारतातील कन्याकुमारीपर्यंत, तर पश्चिमेकडील गुजरात-राजस्थानमधील तीर्थक्षेत्रासह पूर्वेकडील बंगालमधील कोलकात्यानजीक गंगानदी-सागर भेटीचे 'गंगासागर' स्थानासह मध्य भारतातील अयोध्या, काशी, प्रयागधाम, गया, इत्यादी विविध तिर्थांचे दर्शन वेगवेगळ्या सत्संग तीर्थयात्रांतून घडले.

या लेखातून 'अमरनाथ वैष्णोदेवी सत्संग तीर्थयात्रे'बाबत थोडे जाणून घेऊ. ही सत्संग यात्रा जुलै २००६ मध्ये झाली.

'सत्संग तीर्थयात्रा स्पेशल रेल्वे कोपरगाव वरून निघून कोपरगाव ते दिल्ली हा टप्पा, यामध्ये

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

इटारसी, बिना, झाशी, ग्वाल्हेर, आग्रा, मथुरा, वृंदावन स्टेशन पार करून दिल्लीला आली.

स्नानादी कार्यक्रम उरकून अल्पोहार घेऊन सर्वांनी स्थानिक आराम बसद्वारे दिल्ली शहर पाहिले. त्यात राजघाटावरील पूज्य महात्मा गांधी समाधी, लाल किल्ला, कुतुबमिनार, संत नागपाल यांचे प्रसिद्ध मंदिर पाहिले. सफदरजंग स्टेशनवर सर्वांचे भोजन झाले. प. पू. सद्‌गुरूंसमवेत सत्संग कार्यक्रम झाला.

त्याच रात्री ११.३० वा. दिल्लीवरून यात्रा स्पेशल रेल्वेचा पुढील प्रवास करून सकाळी ७.०० वाजता पंजाबमधील अम्बाला छावणी, लुधियाना स्टेशन पार करून अमृतसरला सकाळी ८.३० वा. पोहोचलो.

अमृतसर (पंजाब) येथे प्रसिद्ध सुवर्णमंदिरात आलो. पवित्र जलसरोवरात स्नान करून मंदिरात संत गुरुनानक स्थानाचे रांगेतून सर्वांनी दर्शन केले. सर्वांनी मंदिरात महाप्रसाद घेतला. दुपारी ४ वाजता बसने भारत-पाक सीमेवरील 'वाघा बॉर्डर' सीमेवर जाऊन सैनिकांचे एकत्रित संचलन (परेड) पाहिले.

सायंकाळी अमृतसर येथे संत निर्मलादेवी यांचेकडे प. पू. सद्‌गुरूंच्या उपस्थितीत सत्संग कार्यक्रम झाला, महाप्रसाद झाला.

दिनांक १९ जुलै २००६ रोजी मध्यरात्री रेल्वेने अमृतसर ते जम्मू प्रवास करीत सकाळी १०.०० वाजता रेल्वे जम्मूला आली. जम्मू येथे गटागटाने जाऊन जम्मू परिसरातील विविध मंदिरे-परिसर त्यात प्रसिद्ध श्री रघुनाथ (श्रीराम) मंदिर पाहिले, दर्शन घेतले. जम्मूमधील तावी नदी परिसरातील इतर धार्मिक स्थळे पाहिली. जम्मूला मुक्कामी असलेल्या हॉटेलवर प्रवासातील अधिकची वस्तू साहित्य रूमवर ठेवून 'अमरनाथ' येथे जाण्याकरिता फक्त आवश्यक ते महत्त्वाचे सामान बरोबर घेतले. प्रसाद भोजनानंतर रात्री जम्मू मधून आरक्षित आराम बसने जम्मू ते अमरनाथ प्रवास सुरू झाला.

जम्मू ते काश्मीर श्रीनगर साधारण ३०० किलोमीटर अंतर प्रवास करीत पुढे श्रीनगर ते सोनमर्ग मार्गे हिमालयाचे पायथ्याशी 'बालताल' मुक्कामी पोहोचलो. प्रवासात सर्वत्र सुरक्षा व्यवस्था चांगली होती. बालताल येथे लंगरमध्ये महाप्रसाद घेतला. बालतालमध्ये निवास व्यवस्था चांगली होती.

सकाळी स्नानादी उरकून बालताल ते अमरनाथ गुफा हा १२ किलोमीटर प्रवास हिमालयाच्या कुशीतून केलेल्या दुर्गम अरुंद वाटेवरून होता. घोडेस्वारी करूनही जाता येते. एका बाजूला हिमालयाची उत्तुंग शिखरे, खाली दरी व त्यामधील वेगाने वाहणारी नदी. हिमालय पर्वताची बर्फाच्छादित मनोहारी शिखरे सूर्यप्रकाशात चमकत होती. १२ किलोमीटरची पर्वत चढण, पायी प्रवास करीत ३९०० मीटर (१३००० फूट) उंचीवरील अमरनाथ गुफेनजीक आलो. सैनिकी बंदोबस्त होता. सर्वांनी शिस्तीत रांगेत पवित्र बाबा अमरनाथ बर्फानी श्री भोलेनाथ दर्शन केले.

बालताल ते अमरनाथ हेलिकॉप्टरची सोय हवामान अनुकूलतेनुसार करण्यात आलेली आहे.

अमरनाथ येथे जाण्यासाठी पहलगाम, चंदनवाडी, पिसू टॉप, शेषनाग आणि पंचतरणी या ३५ किलोमीटर अंतराचे पर्वतमय भागातून दुसऱ्या मार्गाने काही भाविक श्री अमरनाथ दर्शन यात्रा करतात. प्रत्यक्ष महादेवांनी पार्वती देवींना आत्मतत्त्वाचे रहस्य या अमरनाथ गुफेत एकांतात निवेदिले असल्याचे सांगतात.

अमरनाथ दर्शनानंतर सर्व भाविक खाली बालताल येथे मुक्कामाच्या स्थळी आले. सकाळपासून असलेल्या स्वच्छ हवामानात त्वरेने बदल होऊन वातावरण बदलून पावसाळी झाले होते.

सद्‌गुरू आणि संतांच्या सानिध्यात हिमालयात झालेले अमरनाथ भोलेनाथ दर्शन सर्वांना मनाला आनंद व प्रसन्नता देणारे होते.

बालतालवरून परतीच्या प्रवासात सोनमर्ग ते श्रीनगर व पुढे श्रीनगर ते जम्मू रोडने साधारण ३८०

किलोमीटर प्रवासात वाटेत विश्रांतीदरम्यान काश्मीरमधील 'केशर' शेती पाहिली. काश्मिरी सुकामेवा खरीदला. काश्मिरी कलाकुसर असलेल्या शाली इत्यादी वस्तू खरेदी केल्या. बस 'कटरा' मुक्कामी आल्या. सकाळी स्नानादी उरकल्यावर कटरा येथून प्रसिद्ध वैष्णोमाता देवी दर्शनासाठी निघालो.

पर्वतावरील वैष्णोमाता दर्शनास कटरा ते वैष्णोभवन हे १२ किलोमीटरचे अंतर पायऱ्या फरशीचे टप्पे असलेल्या रस्त्यावरून पायी जाता येते. येथे हि  घोड्यावरून जाता येते. पायी प्रवासास साधारण ५ तास अवधी लागतो. रांगेतून श्री माता वैष्णोदेवी दर्शन केले. मात्र वैष्णोदेवी एक 'प्राकृतिक पिंड' स्वरूपात आहे. गुहेतून जाऊन दर्शन होते. दर्शनासाठी या ठिकाणी रोज हजारोंचे संख्येने भक्त भाविक येतात. पर्वतावरून खाली उतरताना बाजूस 'भैरोबा देव' दर्शन झाले. कटरा स्थळी रात्रीचे मुक्कामात कटरातील त्रिकूट भवनांत सर्व संतांचे सानिध्यांत प.पू. सद्गुरु समावेत सत्संगाचा भव्य कार्यक्रम झाला. प्रसाद भोजन झाले. या ठिकाणी प.पू. सद्गुरूंनी भक्तांना अनुग्रह दिला. याच सत्संगात प.पू. बाबांनी कोकमठाण आश्रम स्थळी 'आत्मा मालिक भव्य मंदिर' उभारण्याचा मनोदय प्रकट केला. यथासांग नंतर त्यानुसार तो पूर्णही झाला.

कटरा ते जम्मू बसणे ४८ किलोमीटर अंतर पार केले. जम्मू स्टेशनवरून स्पेशल आरक्षित रेल्वेने परतीचा प्रवास दोन दिवसा/रात्रीचा प्रवास करीत कोपरगावी सत्संग यात्रेतील सर्व यात्रेकरू सुखरूप पोहोचले. सर्वांच्या मनात आनंद व समाधान होते. सद्‌गुरूचरणी वंदन करून यात्रेकरू आपल्या गावी गेले. सद्‌गुरूचरणी समर्पित.

**आत्मा मालिक!**

**– बी. के. गायकवाड**

प्लॉट क्र. ५, नव महाराष्ट्र को. ऑप.
हौसिंग सोसायटी, सातारा रोड,
अरण्येश्वर कॉर्नर, पुणे - ४११००९

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

# सद्गुरू वंदना महोत्सव-२०२४

आत्मा मालिक ध्यानपीठ, आत्मा मालिक ध्यान योग मिशनद्वारे कोकमठाण येथे दि. १७ सप्टेंबर २०२४ रोजी, अनंत चतुर्दशी, भाद्रपद चौदसला प. पू. सद्गुरूंचा प्रकटदिन अर्थात सद्गुरु वंदना महोत्सव साजरा झाला.

सकाळी ब्रह्म मुहूर्तावर आत्मस्वरूपाचे पाद्यपूजन झाले. नामजप, भजन, यज्ञविधी व शांतीपाठाने प्रातःकाळचा कार्यक्रम पार पडला.

सकाळी ठीक ९ वाजता सर्व संतांचे व प. पू. सद्गुरूंच्या सानिध्यात उपस्थित सर्व विश्वस्त या कार्यक्रमासाठी आलेल्या भाविकांचे आणि शैक्षणिक गुरुकुलातील शिक्षक व विद्यार्थी यांच्या उपस्थितीत सत्संगास प्रारंभ झाला. संत परमानंद महाराज यांनी आत्मा मालिक ध्यानयोग मिशनच्या वतीने आलेल्या सर्व भाविकांना शुभेच्छा दिल्या. आश्रमातील विद्यार्थ्यांनी विविध गुणदर्शनांत 'आत्मस्वरूप श्री गणेश' देखाव्याचे सादरीकरण केले. आत्मा मालिक ध्यानपीठ, विद्याधाम सत्संग हॉल व परिसरात विद्युत रोषणाई करण्यात आलेली होती.

संत परमानंद महाराज यांनी या प्रकटदिनाचे महत्त्व सांगताना म्हटले, सद्गुरुंनी अनंत चतुर्दशी आत्मसाक्षात्कार प्रकट दिन हा सद्गुरूंच्या विश्वात्मक कार्यात प्रारंभीपासून तन-मन-धन अर्पून आपले जीवितकार्य सद्गुरुचरणी सर्वभावे समर्पित केले. जे आज हृदयनिवासी झाले अशा सर्व संत, संतमातांच्या स्मरणार्थ 'आत्मवंदना महोत्सव' म्हणून साजरा होतो. 'या सर्व हृदयनिवासी संतांना व संतमातांना त्यांच्या गुरुभक्तीप्रति आत्मस्मरण करून वंदन करण्यांत आले. यासमयी त्यांची प्रतिमा, फोटो नामनिर्देश करून पडद्यावर चित्रफितीद्वारे दर्शविण्यात आले. प. पू. सद्गुरूंच्या सानिध्यात सत्संग-मौनध्यान झाले. नंतर आरती झाली.

उपस्थित सर्व विद्यार्थी शिक्षक यांनी रांगेतून दर्शन घेतल्यानंतर आलेल्या सर्व भक्त-भाविकांनी प. पू. सद्गुरूंचे रांगेतून दर्शन केले. आलेल्या सर्व भाविकांनी प्रसाद भोजन केले.

सायंकाळी ठीक ४ वाजता येवला या प. पू. सद्गुरूंच्या तपोभूमीतून आत्मप्रेमी भक्तांनी आत्मदेवाची पालखी पायी दिंडी सोहळ्याद्वारे आणाली. मोठ्या उत्साहात आत्मामालिक ध्यानपिठाच्या प्रवेशद्वारासमीप आगमन झाले. आत्मा मालिक ध्यान योगमिशन सद्गुरूंच्या वतीने या दिंडी सोहळ्याचे आश्रमातील संतांनी स्वागत केले, पालखी पूजा झाली. संत सदानंद महाराज, संत विवेकानंद महाराज व इतर सर्व संतांनी पालखी दिंडी सोहळा चैतन्यभूमी प्रदक्षिणा करून आत्मदेवाच्या मंदिरात आले. तेथे पाद्यपूजन करून आरती झाली व हा दिंडी सोहळा सत्संग हॉलमध्ये आला. सत्संग हॉलमध्ये शैक्षणिक संकुलातील विद्यार्थ्यांनी हरिपाठ म्हटला. नंतर आश्रमातील भजनी मंडळाची भजन सेवा सादर झाली.

जय आत्मदेव, जय आत्मदेव, या भजन गीतांनी सायंकाळच्या सत्संग प्रारंभ झाला. संत परमानंद महाराज यांनी पुन्हा एकदा सद्गुरु वंदना महोत्सवाचे महत्त्व सांगितले व प. पू. सद्गुरूंनी या कोकमठाण येथील स्थळी येण्याआधी प्रथम येवला येथील तपोभूमीत श्रीसोमगिरी मठात दोन तपांहून अधिक काळ केलेली खडतर तपश्चर्या व आत्मस्वरूप साधनेच्या संदर्भात माहिती सांगितली. समस्त उपस्थित येवला निवासी आत्मप्रेमी भक्तांतील ज्यांनी ही सद्गुरूंची तपश्चर्या जवळून पाहिली व मनोभावे समर्पित सेवा केली त्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. येवलानिवासी विठ्ठल शेलार यांच्याकरवी ब्राह्मणांद्वारे ॐ गुरुदेव पादुका पूजन झाले.

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

येवलावासीयांनी मागील सात दिवस परमानंद महाराज लिखित अवतारलीला आत्मस्वरूपाची (नित्यनियम साधना) या ग्रंथाचे पारायण केले. त्याची पूर्तता ग्रंथातील पाचवा अध्याय कृपासार्थक वर्णन, प. पू. सद्‌गुरूंच्या सानिध्यात वाचन केले. संत परमानंद महाराज यांनी येवला तपोभूमीचे महत्त्व सांगितले.

या प्रकट दिन आत्मवंदना महोत्सवानिमित्त आलेले मा. खासदार डॉ. हेमंत सावरा यांचे आत्मा मालिक ध्यान योग मिशनद्वारे स्वागत प्रसंगी संत परमानंद महाराज यांनी हेमंत सावरा यांचे पिता हृदयनिवासी विष्णू सावरा यांना वंदन करून श्रद्धांजली वाहिली व त्यांच्या कार्याचा उल्लेख केला. त्यांनी शासनाचे वतीने हजारो आदिवासी मुला-मुलींना चांगले शिक्षण व उज्वल भवितव्यासाठी आत्मा मालिक गुरुकुल शिक्षण संस्थेच्या वेगवेगळ्या केंद्रांत दाखल केले. ही मुले गुणवत्तापूर्ण शिक्षण प्राप्त करून दहावी व बारावी झाली. या कार्यासाठी आत्मा मालिक ध्यानपीठाद्वारे ऋण व्यक्त केले. सावरा यांचा सत्कार ध्यानयोग मिशनचे अध्यक्ष निजानंद महाराज व आश्रमाचे अध्यक्ष नंदकुमार सूर्यवंशी यांनी केला.

आत्मस्वरूपाची संध्याआरती झाली. येवला सत्संग भजनी मंडळ आणि इंदौर सत्संग मंडळांनी श्रीगुरुभक्तीगीते सादर केली. तद्‌नंतर उपस्थित सर्व भाविकांनी रांगेतून सद्‌गुरूंचे दर्शन घेतले. परमानंद महाराज यांनी आलेल्या सर्व मान्यवरांना धन्यवाद दिले. रात्री ८.३० वाजता नामदान घेणाऱ्या भाविकांचा नामदान विधी झाला. यानंतर आत्मा मालिक सद्‌गुरु वंदना महोत्सवाची सांगता झाली.

**(संकलन- बी. के. गायकवाड, पुणे)**

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



## शरीर की भक्ति क्यों?

**कभी ध्यान दिया की जिस शरीर पर हम अपना सब कुछ न्योछावर कर रहे हैं, उसमें से सिवाय कूड़े के कुछ नहीं बाहर आ रहा, जब हम बच्चे रहते है तो, मां सुबह कहती है - बेटा मुंह धो लो, दांत साफ करो बदबू आ रही है, कचरा बाहर आता है, हम शौचालय जाते हैं सिर्फ गंदगी बाहर निकालने के लिए, शरीर से निकला पसीना हमारे कपड़ों में बदबू भर देता है, कई वार हम लोगों की सांस से भी बदबू ही आती है, यानी इसमें हम सब अच्छा डाल रहे हैं और इसमें से सिवाय कूड़े के कुछ बाहर नहीं आ रहा।**

**- नीता नरेश यादव**

अनादि काल से, अनंत अनंत ज्ञान बाँटने का कार्य भिन्न-भिन्न रीतियों, विधियों और तरकीबों से ना केवल आध्यात्मिक जगत में, बल्कि; आध्यात्मिक जगत से आम सांसारिक जगत में; आत्मनों की संपूर्ण जीवन रेखा के साथ चलता आ रहा है, और हर दम चलता रहता है, केवल हमें मुद्दा छेड़ने की ज़रूरत है, कोई भी समस्या हो, हम जहाँ भी बैठे हैं हमें ज्ञान व हल के रास्ते मिल जाएंगे, हम या बोलें या ना बोलें; तो भी ऑफर हो ही जाएंगे, किंतु अधिकांश ज्ञानी बंधुओं का, अपनी स्वयं की वारी आते ही, आदर्श का फ्रेम बदल जाता है, और हमें संपूर्ण ज्ञान का अम्लीजामा अपने स्वरूप से बाहर दिखाई देता है, संत कबीर ने शताब्दियों पहले ही मूल बात को बहुत अच्छे से हमारे समक्ष इस प्रकार से रख दिया था -

**नहाए धोये क्या हुआ, जो मन मैल ना जाये।**
**मीन सदा जल में रहे, धोये वास ना जाये।।**

अगर आज संसार में नजर डालें तो पाएंगे हर इंसान शरीर से ही जुड़ा है, सारा ध्यान इसी की पालना, इसकी देखभाल, इस शरीर के रुतबे के आसपास ही घूम रहा है पर जब इसका अंत आता है, तो फिर यह शरीर, जिसके लिए सब जुटाया, जिसके वैभव के लिए न दिन देखा न रात वो तो मिट्टी हो गया।

कभी ध्यान दिया की जिस शरीर पर हम अपना सब कुछ न्योछावर कर रहे हैं, उसमें से सिवाय कूड़े के कुछ नहीं बाहर आ रहा, जब हम बच्चे रहते है तो, मां सुबह कहती है - बेटा मुंह धो लो, दांत साफ करो बदबू आ रही है, कचरा बाहर आता है, हम शौचालय जाते हैं सिर्फ गंदगी बाहर निकालने के लिए, शरीर से निकला पसीना हमारे कपड़ों में बदबू भर देता है, कई वार हम लोगों की सांस से भी बदबू ही आती है, यानी इसमें हम सब अच्छा डाल रहे हैं और इसमें से सिवाय कूड़े के कुछ बाहर नहीं आ रहा।

हम अच्छी से अच्छी शिक्षा प्राप्त करते है तो भी जब मुंह खुलता है; कितनी जगह हम पाते हैं! अपशब्द (गाली) बाहर आते सुनाई देते है, कहीं किसी की बुराई बाहर आती है, तो कहीं किसी की तारीफ में किसी को प्रोत्साहन नहीं बल्कि गिराने की सोच पहले बाहर आती है, दूसरे से ईर्ष्या होती है ,नफरत होती है अगर इस शरीर से और इसमें रहने वाले मन से सिर्फ गंदगी ही बाहर आनी है तो इसकी भक्ति क्यों?

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

फिर ऐसा इसमें क्या है? जो इसका महत्व है, हम सब इस बात को बचपन से सुनते आ रहे हैं, कि यह शरीर इसमें रहने वाले ईश्वर तत्व जिसे हम आत्मा कहकर जानते है, की वजह से ही इस शरीर का वजूद है। भगवान श्री कृष्ण महाभारत का वो प्रसंग; साधारणतः: हम सब को याद ही होगा जब खुद भगवान अर्जुन को कहते है; आप रथ से पहले उतरिए, उनके उतरने के बाद जब स्वयं भगवान उतरते हैं, तो रथ जलकर भस्म हो जाता है, आपने देखा होगा जब इस शरीर रूपी रथ से भगवान (यह अमर आत्मा) उतर जाती है तो यह शरीर भी अपना अस्तित्व खो देता है, और हम इसे अग्नि को समर्पित कर देते है, या भूमि में दबा देते है या जल प्रवाहित कर देते है।

आज के भाषा में अगर समझना चाहे तो, जैसे यदि कंप्यूटर में करप्टेड फाइल आ जाए तो हार्डवेयर और सॉफ्टवेयर सब करप्ट हो जाता है, खराब हो जाता है, उसे फॉर्मेट करना पड़ता है, सॉफ्टवेयर रीसटॉल और कई बार हार्डवेयर भी रिप्लेस करना पड़ता है, ऐसे ही अगर इस शरीर में भी गलत संगति के प्रभाव से मन बुद्धि मलिन हो जाए और यह भी प्यार, दया, आदर, मिलनसारिता, सत्कार, निस्वार्थ सेवा इत्यादि को भूल कर नफरत, वैर, ईर्ष्या, लालच, लोभ जैसे अवगुण अपना ले, फिर दुख तथा तकलीफ से यह शरीर पीड़ित रहे, तो हम देखते हैं, इसका महत्व नष्ट हो जाता है, ईश्वर तत्व के होते हुए भी यह कष्ट में रहता है।

हम इस सब मलिनता वश कई वार भूल जाते हैं, कि इस शरीर का अस्तित्व; इसमें विराजमान इस ईश्वरीय शक्ति के कारण है, हमारा ध्यान इस नाशवान शरीर की बजाए इस शक्ति पर केंद्रित होना चाहिए जिसकी वजह से इस शरीर की शोभा है। इसके विराजमान होने से ही इसका अस्तित्व है, अतः: इस ईश्वरीय शक्ति को महत्व देना ज़रूरी है, इसे जानना भी जरूरी है, तभी इस जीवन का वास्तविक आनंद प्राप्त होगा, हम भी अगर ऐसा महसूस करते हैं, कि हमारे शरीर का सॉफ्टवेयर भी करप्ट हो गया है, और कहीं नेगेटिव अवगुणों से भर गए है, अशांत है, हमको क्रोध आता है, नफरत होती है कई बार लोगो से, हम भी स्वार्थी हो गए है, तो हमें जागना चाहिए और संत जनो से सत्संग पाकर अपने सॉफ्टवेयर को रीइंस्टॉल कराना चाहिए, वस ख़ूब सोच समझ कर कि यह सब ऐसे संतत्व के सानिध्य में हो रहा है या वह वही है, जो इसे जानता है सच को समझता है और आत्म तत्व से सराबोर होकर ईश्वर कृपा का पात्र है, तभी सही और ओरिजिनल सॉफ्टवेयर रीइंस्टॉल होगा और हम फिर नए अपडेटेड हो जायेंगे।

आशा करती हूं, हम मनन करेंगे और इस शरीर से ज्यादा इसमें विराजमान इस ईश्वरीय सत्ता पर ध्यान देंगे, जिसकी खुशबू से हमारा जीवन महक उठेगा, हम हमेशा प्रसन्न रहेंगे, प्यार बांटने और प्यार ही प्राप्त करने का काम करेंगे। इस आत्म परमेश्वर से प्रार्थना है, कि सब पर कृपा बनी रहे, सब शारीरिक महत्व को समझकर उससे ऊपर उठकर इस आत्म प्रेम अमृत को प्राप्त करें,

आज के युग के इस नकरात्मकता के माहौल में भी आनंदित रहकर, इस जीवन का सही मूल्य समझ कर अपने अंदर विराजित आत्म तत्व में अपना मन और बुद्धि डालकर उसे आत्म तत्व में विलोपित कर समझें की इस शरीर की भक्ति क्यों? जानकार इस जीवन यात्रा को जारी रख संपन्न करें। गुरु का सानिध्य इसमें हमारी बहुत मदद करेगा, इसी क्रम में कुछ काव्य गुरु भक्ति के लिये उदित हुए, जिन्हें

वंदन में व्यक्त किया है -

**वंदन**

**दीन दुखी राजा हरि, सब माहीं दर्शन होत।**
**आत्मा मालिक न सजे, तो सब माटी होय।।**
**इसके मालिक सतगुरु, जो हम इस जग पाये।**
**जान सको तो जान लो, चुन हमें सतगुरु लाए।।**
**जन्म हमारा सफल है, राह लगन की होय।**
**हे सतगुरु कृपा करो, हम दो न एक ही होय।।**
**आप रहो सब जगत में, सभी समय के साथ।**
**चरणन शीश नवाय के, हम यादव जोड़ें हाथ।।**

अभी कुछ समय पहले अनंत चतुर्दशी पर परम श्रद्धेय गुरुदेव का प्राकट्य दिवस हम सभी के लिए एक पूर्ण उत्साह देकर गया, सभी आत्मनों को हार्दिक हार्दिक शुभकामनाएँ और आप सदाँ स्वस्थ्य और प्रसन्न चित रहकर ध्यान मय बने रहें, ऐसी हमारी कामनाएँ है, सभी गुरु परिवार आत्मनों का आत्मीय अभिनंदन-

आत्मा मालिक।

**- नीता और नरेश यादव,**
आत्मा मालिक परिवार, इंदौर

***




सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.






# आत्मशक्ती नवरात्रौत्सव

निमित्त

## मन:पूर्वक शुभेच्छा!



* प्रेषक *

संपादक, मासिक ॐ गुरुदेव

**विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, कोकमठाण,**

मु.पो.कोकमठाण (चैतन्यपुरी), शिर्डी-कोपरगांव रोड,

ता. कोपरगांव, जि. अहमदनगर (महाराष्ट्र)-४२३६०१